सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

यशोमुद्रा
महाराष्ट्र

प्रधानमंत्री
mudra
योजना

सत्यमेव जयते

यशोमुद्रा

महाराष्ट्र

सत्यमेव जयते

CH. Vidyasagar Rao
GOVERNOR OF MAHARASHTRA

RAJ BHAVAN
Malabar Hill
Mumbai 400 035

13th December 2018

MESSAGE

I am pleased to know that Government of Maharashtra is organizing an awareness programme about the Pradhan Mantri MUDRA Yojana (PMMY) in Mumbai on 19th December 2018.

The Pradhan Mantri MUDRA Yojana was launched by the Hon'ble Prime Minister in the year 2015 with a view to provide loans to the non-corporate, non-farm small and micro enterprises. It is a matter of great pride and satisfaction that Maharashtra has played a steller role in the successful implementation of the Scheme and has disbursed loans to the extent of Rs.62000 crore. This has helped a large number of youths and women in starting new enterprises. The MUDRA Yojana has empowered the people, particularly rural women and youths and made them financially self-sufficient. It is only appropriate that a new website of the MUDRA Yojana is being launched in Maharashtra and beneficiaries of the Yojana are being felicitated.

I congratulate the Department of Finance of Government of Maharashtra for its initiative in organizing the awareness programme about PMMY and convey my best wishes for the success of the event.

CH. Vidyasagar Rao

सत्यमेव जयते

देवेंद्र फडणवीस
मुख्य मंत्री,
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ डिसेंबर २०१८

शुभेच्छा

मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या प्रधानमंत्री मुद्रा योजना या महत्त्वाकांक्षी योजनेची यशस्वी अंमलबजावणी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये यशस्वीपणे केली जात आहे, ही बाब निश्चितच आनंददायी आहे. तसेच या जिल्ह्यांमधील मुद्रा योजनेतील लाभार्थ्यांच्या प्रातिनिधिक यशोगाथा पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे.

स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्योदय संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी मोदीजींच्या प्रेरणेतून साकारलेली ही योजना सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधार घडवण्यास खऱ्या अर्थाने चालना देणार आहे. आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात सर्वसामान्य माणूस येण्यासाठी मुद्रा, स्टार्टअप यांसारख्या योजनांची सर्व राष्ट्रीयीकृत बँकांकडून जाणिवेने अंमलबजावणी होत आहे याची नोंद घेतलीच पाहिजे. मुद्रा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यातील अनेक युवकांना आम्ही आत्मनिर्भर होण्यास मदत करू शकल्याबद्दल आम्हाला मनस्वी समाधान आहे. युवकांचे आर्थिक स्वावलंबन आणि परिवर्तनाचे एक नवे पर्व यानिमित्ताने सुरू झाले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे औद्योगिक विकासासाठी परकीय गुंतवणुकीवर असलेले अवलंबित्व संपुष्टात येणार असून त्यामुळे औद्योगिक विकासाचे विकेंद्रीकरण होऊन त्यात स्वयंपूर्णता येईल असा विश्वास वाटतो.

या यशोगाथा राज्यातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरतील अशी आशा आहे.



देवेंद्र फडणवीस

सत्यमेव जयते

सुधीर मुनगंटीवार
मंत्री
वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ डिसेंबर २०१८

संदेश

शैक्षणिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या आपल्या राज्याने पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजींचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुद्रा योजनेच्या अंमलबजावणीत लक्षणीय कामगिरी करून दाखवली आहे. सागरकिनारे, पर्वतरांगा, वने व अभयारण्ये, औद्योगिक शहरे अशी संपन्न विविधता लाभलेल्या महाराष्ट्रातल्या अनेक लघुउद्योजकांनी मुद्रा योजनेचा लाभ घेतला असून त्यातून आपला व्यवसाय यशस्वी करून दाखवला आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका प्रातिनिधिक लाभार्थीची यशकथा प्रकाशित करणारे हे पुस्तक म्हणजे एक महत्त्वपूर्ण दस्तावेज ठरेल असा मला विश्वास आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीत योगदान देणारे सर्व जिल्हाधिकारी, संबंधित अधिकारी, राज्यातील लीड बँका व तेथील अधिकारी व कर्मचारीवर्ग अशा सर्वांचे मी यानिमित्त अभिनंदन करतो.

देशातील तरुणाईला बेरोजगारीच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी व आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र शासनातर्फे जे उपक्रम राबवले जात आहेत, त्यात 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' अग्रस्थानी आहे. बेरोजगारांना कर्जपुरवठा करून त्यांना व्यवसाय करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी उत्तेजन देणारी योजना असे या योजनेचे स्वरूप आहे. आज ही केवळ एक शासकीय योजना न राहता लोकांच्या स्वप्नांना आकार देणारी, त्यांचे भविष्य घडवणारी चळवळ बनली आहे. सर्व जिल्ह्यांमधील लहानमोठ्या गावांमध्ये स्वत:चा छोटा मोठा व्यवसाय सुरू करण्याची मनीषा बाळगून असलेल्या या उद्यमशील तरुणांना सर्व प्रकारचे साहाय्य देण्यास संबंधित संस्था वचनबद्ध आहेत ही अभिनंदनीय बाब आहे. विशेषत: जिथे इच्छाशक्ती आहे, परिश्रम करण्याची जिद्द आहे, तेथे केवळ पैशाअभावी तरुणाईचे उद्योजकतेचे स्वप्न अपुरे राहू नये यासाठी या योजनेच्या अंमलबजावणीवर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे.

शासनाने मुद्रा योजना कार्यक्रमाअंतर्गत अनेक उपक्रम राबवले आहेत. ज्या नवउद्योजकांनी मुद्रा अंतर्गत कर्ज घेऊन आपले व्यवसाय सुरू करून ते यशस्वीरित्या चालवून दाखवले त्यांच्या यशकथा संकलित केलेले प्रस्तुत पुस्तक प्रेरणादायी ठरेल ही अपेक्षा.

सुधीर मुनगंटीवार

सत्यमेव जयते

दीपक केसरकर
राज्यमंत्री
गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

दिनांक : ११ डिसेंबर २०१८

संदेश

देशातील एक प्रगतिशील राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची ओळख आहे. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुद्रा योजनेच्या अंमलबजावणीतही आपल्या राज्याने लक्षणीय कामगिरी करून दाखवली असून या योजनेच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाची आणि रोजगाराची नवी चळवळ उभी राहिली आहे. मुख्यत: भांडवलाअभावी तरुणाईचे व्यवसाय करण्याचे स्वप्न अपुरे राहू नये म्हणून साकार झालेल्या या योजनेने अनेक व्यवसायांची आणि त्याबरोबरच रोजगारांची निर्मिती केली असून प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थींच्या यशोगाथा पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचे राज्यसरकारने ठरवले आहे. या यशोगाथांचे संकलन असणारे प्रस्तुत पुस्तक अनेकांना प्रेरणा देणारे ठरेल असा मला विश्वास वाटतो.

देशातील असंख्य तरुणांपुढे बेरोजगारीचा प्रश्न उभा आहे. स्थलांतर, गरिबी, गुन्हेगारी ही सर्व या प्रश्नातूनच निर्माण झालेली फळे आहेत. या संकटातून तरुणाईला बाहेर काढणे व तरुणांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवणे ही काळाची गरज आहे. हेच लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून केंद्र शासनातर्फे 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' राबवण्यात येत आहे. बेरोजगारांना अल्प दराने व विनातारण कर्जपुरवठा करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहित करणारी योजना असे या योजनेचे स्वरूप आहे. राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमधील गावांमध्ये स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उद्यमशील तरुणांना सर्व प्रकारचे साहाय्य देण्याचे संबंधित संस्थांना आदेश दिले गेले आहेत आणि त्याची परिपूर्ण अंमलबजावणी होत आहे ही अभिनंदनीय बाब आहे.

ज्या नवउद्योजकांनी मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज घेऊन आपले व्यवसाय सुरू करून ते यशस्वीरित्या चालवून दाखवले त्यांच्या यशकथांचे समस्त वाचकवर्ग स्वागत करेल ही अपेक्षा.

(दीपक केसरकर)

सत्यमेव जयते

दिनेशकुमार जैन
मुख्य सचिव,
महाराष्ट्र

मुख्य सचिव कार्यालय
हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ डिसेंबर २०१८

शुभेच्छा

होतकरू नवउद्योजकांना कुठल्याही तारणाशिवाय कर्जपुरवठा करणारी योजना म्हणून मुद्रा योजना प्रसिद्ध आहे. आर्थिक स्वावलंबन आणि तळागाळातील कुटुंबांचे जीवनमान उंचावण्यासाठी साहाय्य करणारी एक प्रमुख योजना म्हणून प्रधानमंत्री मुद्रा योजनेची ओळख आहे. या योजनेद्वारे कोणत्याही व्यक्तीस स्वत:चा व्यवसाय सुरू करणे, असलेल्या व्यवसायाचा विस्तार करणे शक्य झाले आहे. त्यामुळे अनेक होतकरू तरुण स्वावलंबी होण्याच्या दिशेने वाटचाल करत असून त्यांच्या उद्योजक होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. देशाच्या एकंदर औद्योगिक क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणाऱ्या आणि औद्योगिक विकासात योगदान देणाऱ्या या योजनेची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अतिशय उत्तम पद्धतीने होत आहे ही निश्चितच गौरवास्पद गोष्ट होय.

राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँकांनी या योजनेची अंमलबजावणी करत असताना प्रशासनास मोलाचे सहकार्य केल्याने व्यवसाय करण्याची इच्छा असणाऱ्या शेवटच्या माणसापर्यंत शासन पोहोचू शकले यासाठी मी राज्यातील सर्व बँकांचे आभार मानतो. मुद्रा योजनेमुळे जिल्ह्याजिल्ह्यातल्या स्थानिक पातळीवरील उद्योगांना प्रोत्साहन मिळून युवकांचे शहरी भागांकडे होणारे स्थलांतर आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्या कमी होण्यास नक्कीच मदत होईल असा मला विश्वास आहे.

राज्याचा मुख्य सचिव या नात्याने मी पुनश्च एकदा या योजनेच्या यशस्वितेसाठी योगदान देणाऱ्यांचे आभार मानतो.

(दिनेशकुमार जैन)

अनुक्रमणिका

मुद्रा योजनेबद्दल मा. पंतप्रधानांचे मनोगत.. १५

यशकथा

१. पिढीजात व्यवसायाला मुद्राचा आधार ....मुंबई २४

२. मुद्राने घडवले भविष्य ....मुंबई उपनगर २५

३. श्रमाचा सुगंध...ठाणे २६

४. विशीतच व्यवसायाचे आव्हान पेलले ....पालघर २७

५. केटरिंगमधून अर्थार्जन ....रायगड २८

६. स्वावलंबी बनवणारा लघुद्योग ....रत्नागिरी २९

७. रंगांची उधळण झाली जीवनाची जोडीदार.....सिंधुदुर्ग ३०

८. गारमेंट व्यवसायातून स्वप्नपूर्ती ....पुणे ३१

९. मुद्रामुळे कमल इंडस्ट्रीची यशस्वी वाटचाल ...सातारा ३२

१०. वॉटरप्रूफिंगमधून संपत्तीनिर्मिती ....सांगली ३३

११. सलून व्यवसायातून रोजगारनिर्मिती ....कोल्हापूर ३४

१२. हस्तकलेतून ‘अर्थ’ गवसला ....सोलापूर ३५

१३. चहाच्या स्टॉलने आयुष्य बदलले ....नाशिक ३६

१४. विद्युत उपकरणांच्या दुकानाने दिला
उपजीविकेचा मार्ग..................................अहमदनगर ३७

१५. मुद्राने आर्थिक ‘दोर’ बळकट केले... ....धुळे ३८

१६. गिरीश झाला फोटो स्टुडिओचा मालक.........नंदूरबार...................... ३९

१७. मुद्राने सोपे केले जगणे............................जळगाव ४०

१८. रिक्षाने दिले उदरनिर्वाहाचे साधन .... औरंगाबाद ४१

१९. आवळा प्रक्रिया : आर्थिक स्थैर्याची हमी ...... जालना ४२

२०. अर्चनाताईंच्या आवडीला मुद्राचे बळ .... लातूर........................... ४३

२१. केटरिंग व्यवसायाने तारले .... बीड ४४

२२. चुलीपलिकडले विश्व गवसले .... उस्मानाबाद ४५

२३. बेन्टेक्स ज्वेलरीतून उत्कर्ष......................... परभणी ४६

२४. गरजांची पूर्तता झाली .... नांदेड............................ ४७

२५. छोटे उद्योग, अर्थार्जनाचा योग .... हिंगोली ४८

२६. उमेशच्या लढाईला मुद्राचे बळ.................... अमरावती ४९

२७. झेरॉक्स व स्टेशनरी व्यवसायाने भरभराट ...... बुलढाणा........................ ५०

२८. रेडीमेड कपडेविक्रीत सापडले
उत्पन्नाचे साधन .... अकोला ५१

२९. स्पा पार्लरने दिले आर्थिक स्वावलंबन .... वर्धा ५२

३०. 'घाम गाळून' पैसा कमविला........................ यवतमाळ........................ ५३

३१. मुद्रा अर्थसाहाय्यामुळे व्यवसायवृद्धी .... वाशिम ५४

३२. शासकीय सेवेचा व्यवसाय .... नागपूर ५५

३३. आणि पार्लरचे स्वप्न फळाला आले............. भंडारा........................... ५६

३४. मुद्रामुळे शिलाई व्यवसायाचा विस्तार.......... चंद्रपूर........................... ५७

३५. मुद्रामुळे शक्य झाला व्यवसायाचा विस्तार.... गोंदिया.......................... ५८

३६. मुद्राचे साहाय्य मिळाले, भविष्य बदलले .... गडचिरोली..................... ५९

३७. गारमेंट मेकिंग प्रशिक्षणातून भविष्य घडवले.. ६०

३८. मुद्राच्या मदतीने अन्न प्रक्रिया व्यवसाय ६१

३९. मार्गदर्शनातून अर्थार्जन.. ६२

४०. टॅक्सी चालवून उपजीविका... ६३

कौशल्य विकासाचा ध्यास.. ६४

'मुद्रा' संबंधित प्रश्नोत्तरे ६५

मा. पंतप्रधानांनी मुद्रा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात त्यांचे विचार सविस्तरपणे मांडले होते. सर्व संबंधितांना प्रेरक ठरणारे त्यांचे हे भाषण...

मुद्रा योजनेबाबत मा. पंतप्रधानांचे मनोगत

उपस्थित सभी महानुभाव,

हमारे देश में एक अनुभव यह आता है कि बहुत सी चीजें Perception के आसपास मंड़राती रहती है। और जब बारीकी से उसकी ओर देखें तो चित्र कुछ और ही नजर आता है। जैसे एक सामान्य व्यक्ति को पूछो तो उसको लगेगा कि भई, ये जो बड़े-बड़े उद्योग हैं, बड़े-बड़े उद्योग घराने हैं, उनसे रोजगार ज्यादा मिलता है। लेकिन अगर बारीकी से देखें तो चित्र कुछ और होता है, इसमें इतनी ज्यादा पूँजी लगी है, इतने सारे ताम-झांम, हवाबाज़ी... यह सब हम देखते आए हैं।

लेकिन अगर बारीकी से देखें तो ultimately हम विकास में हैं। रोजगार हमारी प्राथमिकता है और भारत जैसा देश जिसके पास Demographic dividend हो, जहां पर ६५ प्रतिशत जनसंख्या ३५ से कम आयु की हो, उस देश ने अपने विकास की जो भी नीतियां बनानी हो, उसके केंद्र में ये युवा शक्ति होनी चाहिए। अगर वो बराबर match कर लिया, तो हम नई ऊँचाईयों को पार कर सकते हैं। ये जितने बड़े-बड़े उद्योगों की हम चर्चा सुनते आए हैं, उसमें सिर्फ एक करोड़ २५ लाख लोगों को रोजगार मिलता है। सवा सौ करोड़ देश में सवा करोड़ लोगों को रोजगार, ये जो बहुत बड़े-बड़े लोग जिसके लिए दुनिया में चर्चा रहती है, आधा अखबार जिनसे भरा पडा रहता है, वो देते हैं।

लेकिन इस देश में छोटे-छोटे काम करने वाले व्यक्ति करीब ५ करोड़ ७० लाख लोग, १२ करोड़ लोगों को रोजगार देते हैं। उन सवा करोड़ को रोजगार देने के लिए बहुत सारी व्यवस्थाएं सक्रिय है। लेकिन १२ करोड़ लोगों को रोजगार देने वाले लोगों के लिए थोड़ी सी हम मदद करें, तो कितना बड़ा

फर्क आ सकता है इसका हम अंदाजा कर सकते हैं। और इस ५ करोड़ ७५ लाख इस क्षेत्र में काम करने वाले लोग हैं, जो स्वरोजगार एक प्रकार से हैं। दर्जी होंगे, कुम्हार होंगे, टायर का पंक्चर रिपेअर करने वाले लोग हैं, साइकिल की repairing करने वाले लोग हैं, अपनी एक ऑटो रिक्शा लेकर के काम करने वाले लोग हैं, सब्जी बेचने वाले, गरीब-गरीब लोग हैं... उनका पूरा जो कारोबार है, उसमें ज्यादा से ज्यादा हिसाब लगाया जाए, तो ११ लाख करोड़ रुपयों से ज्यादा उसमें पूँजी नहीं लगी है। यानी सिर्फ ११ लाख करोड़ रुपयों की पूँजी लगी है, ५ करोड़ ७५ लाख उसका नेतृत्व कर रहे हैं, और १२ करोड़ लोगों का पेट भरते हैं।

ये बातें जब सामने आयी तो लगा कि देश में स्वरोजगारी के अवसर बढ़ाने चाहिए। देश की Economy को ताकत देने वाला जो निचले पायदानों पर जो लोग हैं, उनकी शक्ति को समझना चाहिए और उनके लिए अवसर उपलब्ध कराने चाहिए और इस मूल चिंतन में से ये मुद्रा की कल्पना आयी है। मेरा अपना एक अनुभव इसमें काम कर रहा था, क्योंकि सिर्फ आर्थिक जगत के लोगों के आंकड़ों के आधार पर निर्णय करना, इतना सरल नहीं होता है। लेकिन कभी-कभी अनुभव बहुत काम आता है।

देश की Economy को ताकत देने वाला जो निचले पायदानों पर जो लोग हैं, उनकी शक्ति को समझना चाहिए और उनके लिए अवसर उपलब्ध कराने चाहिए और इस मूल चिंतन में से ये मुद्रा की कल्पना आई है। मेरा अपना एक अनुभव इसमें काम कर रहा था, क्योंकि सिर्फ आर्थिक जगत के लोगों के आंकड़ों के आधार पर निर्णय करना, इतना सरल नहीं होता है।

मैं गुजरात में मुख्यमंत्री रहा तो मैंने पतंग उद्योग की तरफ थोड़ा ध्यान दिया। अब गुजरात में पतंग एक बड़ा त्योहार के रूप में मनाया जाता है, और ज्यादातर, अब वो पूरा Environment Friendly Industry है, Cottage Industry है। और लाखों की तादाद में गरीब मुसलमान उस काम में लगा हुआ है। ९० प्रतिशत से ज्यादा पतंग बनाने व कबाड़ का काम गुजरात में मुसलमान कर रहा है, लेकिन वो वही पुरानी चीजें करता था। वो पतंग अगर उसको ट्रायकलर तीन कलर का बनाना है तो तीन कलर के कागज लाता था पेस्टिंग करता था और फिर पतंग बनाता था। अब दुनिया बदल चुकी है तीन कलर का कागज प्रिंट हो सकता है, टाइम बच सकता है। तो मैंने चेन्नई की एक Institute को काम दिया कि जरा सर्वे किजिए कि इनकी मुसीबत क्या है, कठिनाईयां क्या है... अनुभव ये आया कि छोटे-छोटे लोगों को थोड़ी मदद दी जाए, थोड़ा Skill Development हो जाए, थोड़ी पैकेजिंग सिखा दिया जाए, आप उसमें कितना बड़ा बदलाव ला सकते है। मुझे आज कहने से आनंद होता है कि जो करीब ३५ करोड़ का पतंग का बिजनेस था थोड़ी मदद की वो पतंग का उद्योग ५०० करोड़ cross कर गया था।

फिर मेरी उसमें जरा रूचि बढ़ने लगी, तो मैं कई चीजे नई-नई करने

लगा। बांस... बांस वो लाते थे असम से। कारण क्या, तो पतंग में जिस बांस के पट्टे की जरूरत होती है वो साइज का बांस गुजरात में होता नहीं था। तो मैंने ये जेनेटिक इंजीनियरिंग वालों को पकड़ा। मैंने कहा हमारे यहां ऐसा बांस क्यों न हो? दो गांठ के बीच अंतर ज्यादा हो ताकि वो हमारा ही लोकल बांस का product उसको काम आ जाए। बांस वो बाहर से लाता है तो उसको फाइनेंस की व्यवस्था हो। फिर मैंने ऐडवरटाइज़मेंट कम्पनी को बुलाया। मैंने कहा जरा पतंग वालों के साथ बैठो पतंग के ऊपर कोई ऐडवरटाइज़मेंट का काम हो सकता है क्या उनकी कमाई बढ़ सकती है।

आप देखिए हिंदुस्तान में जहां भी विमेन सेल्फ हेल्प ग्रुप चलते हैं, पैसों के विषय में शायद ऐसी ईमानदारी कहीं देखने को मिलेगी नहीं। उनको अगर ५ तारीख को पैसा जमा करवाना है तो १ तारीख को जाकर के जमा करवाकर आ जाती हैं। बचत हमारे यहां स्वभाव है, उसको और जरा ताकत देने की आवश्यकता है। हमारी परंपरागत वो शक्ति है।

छोटी-छोटी चीजों को मैंने इतना ध्यान दिया था और मुझे उतना आनंद आया था उस काम में! I'm Talking about 2003-04. कहने का मेरा तात्पर्य यह था, कि जो बिल्कुल उपेक्षित सा काम था उसमें थोड़ा ध्यान दिया गया, फाइनेंस की व्यवस्था की गई, उसने तेज गति से आगे बढ़ाया। ये ताकत सब दूर है। आप देखिए... हर गांव में दो-चार मुसलमान बच्चे ऐसे होंगे, इतनें Innovative होते है technology में ईश्वरदत्त उनको कृपा है। वो तुरंत चीजों को पकड़ लेते है। आप एक ताला उसको रिपेयर करने को दीजिए, वो दूसरे दिन वो ताला वैसा बना के दे देगा। जिनके हाथों में ये परम्परागत कौशल्य है ऐसे लोगों को अगर हम मदद करें और कर्ज तो वो कुछ गिरवी रखें तब मिले तो उसके पास तो गिरवी रखने के लिए कुछ नहीं है सिवाय कि उसका ईमान। उसकी सबसे बड़ी पूँजी है उसका ईमान। ये गरीब इंसान की जो पूँजी है, ईमान, उस पूँजी के साथ मुद्रा अपनी पूँजी जोड़ना चाहता है, ताकि वो सफलता की कुंजी बन जाए और उस दिशा में हम काम करना चाहते है।

कुम्हार है, अब बिजली गांव में पहुंच गई है। वो भी चाहता है कि मैं मटकी बनाता हूं और चीजें बनाता हूं। लेकिन अगर Electric motor लग जाए तो मेरा काम तेज हो जाएगा। लेकिन Electric motor खरीदने के लिए पैसा नहीं है। बैंक के लिए उनके पास इतना समय भी नहीं है और उतना नेटवर्क भी नहीं है। लेकिन मैं आज, यहां बैंक के बड़े-बड़े लोग बैठे है। मेरे शब्द लिख करके रखिए। एक साल के बाद बैंक वाले Queue लगाएगें मुद्रा वालों के यहां और कहेंगे भई ५० लाख हमको client दे दीजिए।

क्योंकि अब देखिए, प्रधानमंत्री जन-धन योजना में हिन्दुस्तान की बैंक सेक्टर ने जो काम किया है, मैं जितना अभिनंदन करूं उतना कम है। कोई सोच नहीं सकता था... क्योंकि बैंक के संबंध में एक सोच बनी हुई थी कि बैंक यानी इस दायरे से नीचे नहीं जा सकते। तो बैंक के लोगों ने गर्मी के दिनों में गांव-गांव, घर-घर जा करके गरीब की झोपड़ी में जा करके उसको देश की

फाइनेंस की Main Stream में लाने का प्रयास किया और इस देश के १४ करोड़ लोगों को बैंक खाते से जोड़ दिया। तो ये ताकत हमने अनुभव की है, तो उसका ये अलग एक नया step है।

आज वैसे एक और भी अवसर है; SIDBI का रजत जयंती वर्ष है। SIDBI २५ साल की उम्र हो गई और मूलतः SIDBI का कारोबार इसी काम से शुरू हुआ था, छोटे-छोटे लोगों को लेकिन जितनी तेजी से क्योंकि भारत देश rhythmic way में progress करे तो अपेक्षाएं पूरी नहीं होंगी। हमने उस rhythm को बदलकर के jump लगाने की जरूरत है। हमने दायरा बढ़ाने की जरूरत है। हमने अधिक लोगों को इसके अंदर जोड़ने की आवश्यकता है और सामान्य मानव का अपना अनुभव है।

प्रधानमंत्री जन-धन योजना में हिन्दुस्तान की बैंक सेक्टर ने जो काम किया है, मैं जितना अभिनंदन करूं उतना कम है। कोई सोच नहीं सकता था, क्योंकि बैंक के संबंध में एक सोच बनी हुई थी कि बैंक यानी इस दायरे से नीचे नहीं जा सकते। तो बैंक के लोगों ने गर्मी के दिनों में गांव-गांव घर-घर जा करके गरीब की झोपड़ी में जा करके उसको देश की फाइनेंस की Main Stream में लाने का प्रयास किया

आप देखिए, हिंदुस्तान में जहां भी women self help group चलते हैं, पैसों के विषय में शायद ऐसी ईमानदारी कहीं देखने को मिलेगी नहीं। उनको अगर ५ तारीख को पैसा जमा करवाना है तो १ तारीख को जाकर के जमा करवाकर आ जाती हैं। बचत हमारे यहां स्वभाव है, उसको और जरा ताकत देने की आवश्यकता है। वो हमारी परंपरागत शक्ति है।

मुद्रा बैंक के माध्यम से व्यवसाय के क्षेत्र में, स्वरोजगार के क्षेत्र में, उद्योग के क्षेत्र में जो निचले तबके पर आर्थिक व्यवस्था में रहे हुए लोग हैं, वे हमारा सबसे बड़ा client, हमारा सबसे बड़ा target group है। हम उसी पर focus करना चाहते हैं। इन ५ करोड़ ७५ लाख जो छोटे व्यापारी हैं और उनका average कर्ज कितना है? पूरे हिंदुस्तान में ११ लाख करोड़ की उनके पास पूँजी है, पूरे देश में कोई ज्यादा amount नहीं है वो और average कर्ज निकाला जाए तो एक युनिट का average कर्ज १७ हजार है, सिर्फ सेवन्टीन थाऊजंड हैं, यानि कुछ नहीं है। अगर उसको एक लाख के कर्ज की ताकत दे दी जाए। उसको इतना अगर जोड़ दिया जाए और ये ११ लाख करोड़ है वो एक करोड़ तक अगर पहुंच जाए। हम कल्पना कर सकते हैं देश की economy को GDP को, नीचे से ताकत देने का इतना बड़ा force जो कि कभी untapped था।

और इसलिए जब हम प्रधानमंत्री जन-धन योजना लेकर के आए थे तब हमने कहा था, जहां बैंक नहीं उसको बैंक से जोड़ेंगे। आज जब हम

मुद्रा लेकर के आए हैं, तो हमारा मंत्र है जिसको funding नहीं हो रहा है, जो un-funded है, उसको funding करने का हम बीड़ा उठाते हैं।

ये एक ऐसी व्यवस्था है, जिसमें शुरू के समय में सामान्य व्यक्ति जाएगा ये संभव नहीं है क्योंकि बेचारों को अनुभव बहुत खराब है। वो कहता है भई मुझे तो साहूकार से ही पैसा लेना पड़ता है। २४ percent, ३० percent interest देना पड़ता है, वो ही मुझे आदत हो गई है। वो विश्वास नहीं करेगा कि उसको इस प्रकार से ऋण मिल सकता है। हम ये एक नया विश्वास पैदा करना चाहते हैं कि आप देश के लिए काम कर रहे हो, देश के विकास के भागीदार हो, देश आपके लिए चिंता करने के लिए तैयार है। ये message मुझे देना है।

मुद्रा बैंक के माध्यम से व्यवसाय के क्षेत्र में, स्वरोजगार के क्षेत्र में, उद्योग के क्षेत्र में जो निचले तबके पर आर्थिक व्यवस्था में रहे हुए लोग हैं, वे हमारा सबसे बड़ा client, हमारा सबसे बड़ा target group है। हम उसी पर focus करना चाहते हैं। इन ५ करोड़ ७५ लाख जो छोटे व्यापारी हैं और उनका average कर्ज कितना है? पूरे हिंदुस्तान में ११ लाख करोड़ की उनके पास पूँजी है

और ये मुद्रा के concept के द्वारा, उसी दिशा में हम आगे बढ़ना चाहते हैं। हमारे देश में agriculture sector में value addition इतनी बड़ी संभावनाएं हैं। अगर उसकी एक विधा को develop कर दिया जाए तो हमारे किसान को कभी संकटों से गुजरना नहीं पड़ेगा। और ये छोटे-छोटे entrepreneur के माध्यम से ये पूरा network खड़ा किया जा सकता है जो सामान्य किसान, जो सामान्य पैदावार करता है, उसमें value addition का काम करे। और स्थानीय स्तर पर करे। कोई बहुत बड़ी व्यवस्था की आवश्यकता नहीं है। अपने आप उसका काम आगे बढ़ जाएगा।

और हम देखते हैं आम उसको बेचना है, तो बेचारे को बड़ा कम पैसा मिलता है लेकिन एक अगर एक छोटा सा unit भी हो, आम में से अचार बना दे तो ज्यादा पैसा मिलता है और अचार को भी अच्छा बढ़िया bottle में packing करे तो और ज्यादा पैसा मिलता है और कोई नटी bottle लेकर खड़ी हो जाए तो और ज्यादा पैसा मिलता है advertising होता है तो।

यानि वक्त बदल चुका है, branding, advertising इन सारी चीजों की जरूरत पड़ गई है। हम ऐसे छोटे-छोटे लोगों को ताकत देना चाहते हैं। और उनको अगर ताकत मिलती है तो देश की economy की नीचे की धरातल, जितनी ज्यादा मजबूत होगी, उतनी देश की economy को लाभ होने वाला है। और जब मैंने ये आकड़े बताए तो आप भी चौंक गए होगे कि इतना बड़ा तामझाम सवा करोड़ लोग रोजगार पाते है। और जिसकी

ओर कोई देखता नहीं है, वो १२ करोड़ लोगों के पेट भरता है। कितना बड़ा अंतर है। ये जो १२ करोड़ लोग है २५ करोड़ को रोजगार देने की ताकत देते है। वो Potential पड़ा है। और ज्यादा कोई शासकीय व्यवस्था में बड़े बदलाव की भी जरूरत नहीं है। थोड़ी संवदेनशीलता चाहिए, थोड़ी समझ चाहिए और थोड़ा Proactive role चाहिए।

मुद्रा एक ऐसा platform खड़ा किया गया है, जिस platform के साथ इसको आज छोटी-मोटी finance की व्यवस्थाएं चल पड़ी है। दुनिया में कई जगह पर प्रयोग हुए है Micro finance के लिए। मैं चाहूंगा कि हम पूरे विश्व में Micro finance के जो Successful Model है हम भी उसका अध्ययन करें। उसकी जो अच्छाइयां है जो हमारे लिए suitable है, हम उसको adopt करें। और हिन्दुस्तान इतना बड़ा देश है कि जो चीज नागालैंड में चलती है वो महाराष्ट्र में चलेगी जरूरी नहीं है। विविधता चाहिए। और विविधताओं के अनुसार स्थानीय आवश्यकताओं के अनुसार अपने मॉडल बनाएं उसकी requirement करें। वरना हम दिल्ली में बैठ करके tailor के लिए ये और फिर कहेंगे कि तुमको ये मिलेगा तो मेल नहीं बैठेगा। वो वहां है उसी को पूछना पड़ेगा कि भई बताओ तुम्हारे लिए क्या जरूरत है? ये अगर हमने कर दिया तो हम बहुत बड़ी मात्रा में समाज के इस नीचे के तबके को मदद कर सकते है।

हमारे देश में agriculture sector में value addition इतनी बड़ी संभावनाएं हैं। अगर उसकी एक विधा को develop कर दिया जाए तो हमारे किसान को कभी संकटों से गुजरना नहीं पड़ेगा। और ये छोटे-छोटे entrepreneur के माध्यम से ये पूरा network खड़ा किया जा सकता है

जिस प्रकार से सामान्य व्यक्ति की चिंता करना ये हमारा प्रयास है और आपने इस सरकार के एक-एक कदम देखें होंगे, गतिशीलता तो आप देखते ही होंगे। वरना सामान्यत: देश में योजनाओं की घोषणा को ही काम माना जाता था और आप रोज नई योजना की घोषणा करो तो अखबार के आधार पर देश को समझने वाले जो लोग है वो तो यही मानते है कि वाह देश बहुत आगे बढ़ गया। और दो-चार साल के बाद देखते है कि वही कि वही रह गए। हमारी कोशिश है योजनाओं को धरती पर उतारना।

प्रधानमंत्री जन-धन योजना ये सीधी-सीधी दिखती है। पहल

योजना दुनिया में सबसे बड़ा Cash Transfer का काम। गैस सब्सिडी में १३ करोड़ लोगों के गैस सब्सिडी सिलेंडर, सब्सिडी सीधी उसके बैंक खाते में चली गई। यानी अगर एक बार निर्णय करें कि इस काम को पूरा करना है और हर काम को आप देखिए जब हमने १५ अगस्त को प्रधानमंत्री जन-धन योजना की बात कही करीब-करीब सवा सौ दिन के अंदर उस काम को पूरा कर दिया।

जब हम प्रधानमंत्री जन-धन योजना के बाद हम आगे बढ़े सौ दिन के भीतर-भीतर हमने पहल का काम पूरा कर दिया।

और आज जब बजट के अंदर घोषणा हुई, ५० दिन भी नहीं हुए, वो आज योजना आपके सामने रख दी। और ये Functional होगी और उसका परिणाम मैं कहता हूं एक साल मैं ज्यादा समय नहीं कहता। एक साल के भीतर-भीतर हमारी जो Established Banking System है, वो मुद्रा के मॉडल की ओर जाएगी मैं दावे से कहता हूं क्योंकि इसकी ताकत इसकी ताकत पहचान में आने वाली है। वे अपना एक लचीली बैंकिंग व्यवस्था खड़ी करेंगे, एक बहुत बड़ी ऑफिस चाहिए, कोई एयरकंडीशन चाहिए कोई जरूरत नहीं है। ऐसे Bare footed बैंकर्स तैयार हो सकते है जो मुद्रा के मॉडल पर बड़ी-बड़ी बैंकों का काम भी कर सकते है।

मुद्रा एक ऐसा platform खड़ा किया गया है, जिस platform के साथ इसको आज छोटी-मोटी finance की व्यवस्थाएं चल पड़ी है। दुनिया में कई जगह पर प्रयोग हुए है Micro finance के लिए। मैं चाहूंगा कि हम पूरे विश्व में Micro finance के जो Successful Model है हम भी उसका अध्ययन करें।

आने वाले दिनों में कम से कम धन लगा करके भी ज्यादा से ज्यादा लोगों को रोजगार देने का काम इसके साथ सरलता से हो सकता है और ये लोग जो संकट से गुजरते है, ब्याज के चक्कर में गरीब आदमी मर जाता है। उसको बचाना है और उसकी जो ताकत है उसके लिए अवसर देना है उस अवसर की दिशा में काम कर रहे है, जिस प्रकार से देश में ये जो वर्ग है उसकी जितनी चिंता करते है, उतनी ही देश के किसान की चिंता करना उतना ही जरूरी है।

किसी न किसी कारण से देश का किसान प्राकृतिक संकटों से जूझ रहा है। गत वर्ष, वर्षा कम हुई। वर्षा कम होने के कारण वैसे ही किसान मुसीबत से गुजारा कर रहा था और इस बार जितनी मात्रा में बेमौसमी वर्षा और ओले गिरना। इतनी तबाही हुई है किसान की। हमने मंत्रियों को भेजा था। खेतों में जा करके किसानों से बात करके परिस्थिति का जायजा लिया।

कल इन सारे मंत्रियों से मैंने डिटेल में रिपोर्ट ली थी। इन किसानों को हम क्या मदद कर सकते हैं। और मैंने पहले दिन कहा था कि किसान को इस मुसीबत से बचाना, उसका साथ देना, उसको संकटों से बाहर लाना। ये सरकार की, समाज की, हम सबकी जिम्मेवारी है और किसान की चिंता करना ये आवश्यक है।

Natural calamity पहले भी आई है। लेकिन सरकार के जो parameter रहे हैं, उन parameters में आज के संकट में किसान को ज्यादा मदद नहीं मिल सकती है। और इसलिए ये संकट की व्यापकता इतनी है और उस समय है जबकि उसको फसल लेकर के बाजार में जाना था। एक प्रकार से उसके नोटों का बंडल ही जल गया, इस प्रकार से हम कह सकते हैं। इतना बड़ा उसका, उसका पूरा पसीना बहाया हुआ उसका, ये हालत हुई है। और इसलिए हमने insurance company को भी आदेश किया है कि बहुत ही proactive होकर के उनकी मदद की जाए। बैंकों को हमने आदेश किया है कि बैंक उनके जो कर्ज हैं, उनके संबंध में किस प्रकार से restructure करे ताकि उनको इस संकट से बाहर लाया जाए।सरकार की तरफ से भी एक बहुत बड़ा अहम निर्णय हम करने जा रहे हैं। अब तक खेत में ५० प्रतिशत से ज्यादा अगर नुकसान हुआ हो, तभी वो उस मदद पाने की list में आता है। ५० प्रतिशत से ज्यादा अगर नुकसान हुआ होगा तभी आपको मदद मिल सकती है। अगर ५० प्रतिशत से कम हुआ है तो मदद नहीं मिल सकती है। राज्यों के मुख्यमंत्रियों का भी ये एक सुझाव था कि साहब ये norms बदलना चाहिए। हमारे मंत्री अभी जाकर के आए, उन्होंने प्रत्यक्ष देखा, और ये सब देखने के बाद एक बहुत बड़ा हमने एक महत्वपूर्ण निर्णय किया है कि अब किसान के वो जो ५० प्रतिशत के नुकसान वाला दायरा था उसको बदलकर के ३३ percent भी अगर नुकसान हुआ है तो भी वो किसान हकदार बनेगा।

उसके कारण मुझे मालूम है बहुत बड़ा बोझ आने वाला है, बहुत बड़ा बोझ आने वाला है लेकिन किसान को ५० प्रतिशत वाले हिसाब में रखने से उसको ज्यादा लाभ नहीं मिलेगा। ३३ percent जो कि कईयों की मांग थी, उसको हमने स्वीकार किया है।

आने वाले दिनों में कम से कम धन लगा करके भी ज्यादा से ज्यादा लोगों को रोजगार देने का काम इसके साथ सरलता से हो सकता है और ये लोग जो संकट से गुजरते है, ब्याज के चक्कर में गरीब आदमी मर जाता है। उसको बचाना है और उसकी जो ताकत है उसके लिए अवसर देना है उस अवसर की दिशा में काम कर रहे है...

दूसरा विषय है उसको जो मुआवजा दिया जाता है। देश में आजादी के बाद सबसे बड़ा निर्णय पहली बार हुआ है ५० प्रतिशत को ३३ प्रतिशत लाना। और दूसरा महत्वपूर्ण आजादी के बाद इतना बड़ा jump नहीं लगाया है, किसानों को मदद करने में हम इतना बड़ा jump इस बार लगा रहे हैं। और आज उसको जो मदद करने के सारे parameters हैं, उसको अब डेढ़ गुना कर दिया जाएगा। अगर उसको नुकसान में पहले १०० रुपया मिलता था, १५० मिलेगा, लाख मिलता था तो डेढ़ लाख मिलेगा, उसकी मदद डेढ़ गुना कर दी जाएगी। कभी हमारे यहां incremental होता था ५ percent, २ percent, ५० प्रतिशत वृद्धि। और ये किसान को तत्काल मदद मिले। राज्यों ने सर्वे का काम किया है। भारत सरकार और राज्य सरकार मिलकर के उसको आगे बढ़ाएगी लेकिन मैं चाहता हूं हमारे देश के किसानों को जितनी मदद हो सके, उतनी मदद करने के लिए ये सरकार संकल्पबद्ध है। क्योंकि आर्थिक विकास की यात्रा में किसान का भी बहुत बड़ा योगदान है और हमारी जीवन नैया चलाने में भी किसान का बहुत बड़ा योगदान है। बैंक हो, insurance company हो, भारत सरकार हो, राज्य सरकार हो, हम सब मिलकर के किसान को इस संकट की घड़ी से हम बाहर लाएंगे। ऐसा मुझे पूरा विश्वास है।

दूसरा विषय है उसको जो मुआवजा दिया जाता है। देश में आजादी के बाद सबसे बड़ा निर्णय पहली बार हुआ है ५० प्रतिशत को ३३ प्रतिशत लाना। और दूसरा महत्वपूर्ण आजादी के बाद इतना बड़ा jump नहीं लगाया है, किसानों को मदद करने में हम इतना बड़ा jump इस बार लगा रहे हैं।

फिर एक बार मैं SIDBI की इस रजत जयंती वर्ष के प्रारंभ पर उनको मैं बहुत-बहुत शुभकामना देता हूं और SIDBI आने वाले दिनों में नए लक्ष्य को लेकर के और नई ऊंचाइयों को पार करने में सफल होगा, ऐसी मेरी शुभकामनाएं हैं।

और मुद्रा platform प्रधानमंत्री मुद्रा योजना आने वाले दिनों में देश की आर्थिक, जो पक्की धरोहर है उसको जानदार बनाना, शानदार बनाने के काम में मुद्रा बहुत बड़ा role play करेगी। और ये पूँजी उसकी सफलता की कुंजी बने, ये मंत्र को हम चरितार्थ करेंगे। इसी एक शुभ आशय के साथ आज इस महत्वपूर्ण योजना को प्रारंभ करते हुए मुझे खुशी हो रही है, मेरी बहुत-बहुत शुभकामनाएं।

धन्यवाद।

पिढीजात व्यवसायाला मुद्राचा आधार

नाव : अशोक शिंदे

व्यवसाय : गटई कामगार - चप्पल/ बॅग बनविणे आणि दुरुस्त करणे

मुलांचे शिक्षण व इतर अडचणींवर मात करून कुटुंबाच्या भरभराटीसाठी अशोक यांना मुद्राने मदत केली आहे.

अशोक शिंदे यांचा चप्पल शिवण्याचा, दुरुस्त करण्याचा व्यवसाय पिढीजात असून चायनीज मालामुळे त्यांना व्यवसायात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. फक्त चप्पल दुरुस्तीच्या जोरावर मुलांची शिक्षणे पूर्ण करणे कठीण जात होते. त्यावेळी अशोक यांना केवळ २००-३०० रुपये मिळत असल्याने आपण कधी चप्पल/बॅग्ज तयार करून विकू, असे त्यांना वाटलेही नव्हते.

पण दरम्यान मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मुद्रा लोन योजनेबद्दल त्यांना समजले आणि त्यांनी लगेचच बँक ऑफ इंडियाच्या लोअर परेल शाखेशी संपर्क साधला. बँकेने अशोक यांना पूर्ण सहकार्य करून कर्ज लवकरात लवकर व कमी व्याजदरात मंजूर केले. तसेच अशोक यांना भविष्यात स्वत:च्या पायावर उभे राहण्याची नवी उमेद व विश्वास दिला. आता अशोक पहिल्यापेक्षा जास्त पैसे मिळवत असून बँकेच्या कर्जाचीही नियमित परतफेड करीत आहेत. त्यांच्याकडे विक्रीसाठी असणाऱ्या पिशव्यांमध्ये कापडी, कॅनव्हास अशा अनेक प्रकारच्या पिशव्या आहेत. मुलांचे शिक्षण व इतर अडीअडचणींवर मात करून कुटुंबांच्या भरभराटीसाठी अशोक यांना मुद्राने मदत केली आहे. मुद्रा कर्ज योजनेत विनातारण कर्ज घेण्याची सुविधा आहे याबद्दल अशोक शासनाचे आभार मानतात.

मुद्राने घडवले भविष्य

नाव : दीपाली मैन

व्यवसाय : जंबोकिंग फ्रॅन्चायझी

दीपाली मैन ह्या मुंबई उपनगरातील जोगेश्वरी येथे राहतात. त्यांना जंबोकिंग वडापावचे दुकान सुरू करायचे होते. व्यवसाय सुरू करण्यासाठी दीपाली यांना भांडवलाची कमतरता भेडसावत होती. त्या कर्जासाठी बँक ऑफ इंडियाकडे गेल्या असता त्यांना केंद्र सरकारच्या मुद्रा लोन योजनेबद्दल समजले. त्यानंतर त्यांनी बँक ऑफ इंडियाच्या जोगेश्वरी शाखेत कर्जाचा प्रस्ताव दिला. बँकेकडून त्यांना ९ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. त्यांना याप्रकरणी बँकेच्या कर्मचाऱ्यांचे बहुमोल सहकार्य मिळाले. कर्जाची रक्कम मिळाल्यावर त्यांनी मिरारोड येथे जंबोकिंगचे फ्रॅन्चायझी आऊटलेट उघडले. या योजनेबद्दल त्या केंद्र सरकारचे मनापासून आभार व्यक्त करतात. या योजनेमुळे दीपाली यांच्या व्यवसायविस्ताराच्या अपेक्षा रुंदावल्या असून या योजनेअंतर्गत घेतलेल्या कर्जाच्या रकमेमुळे त्यांना व्यवसायवृद्धी करणे, ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणे शक्य झाले. ही योजना नवउद्योजकांसाठी खूप चांगली आहे असे मत व्यक्त करतानाच त्या सर्व संबंधितांना धन्यवाद देतात.

व्यवसाय सुरू करण्यासाठी दीपाली यांना भांडवलाची कमतरता भेडसावत होती. त्यांनी बँक ऑफ इंडियाच्या जोगेश्वरी शाखेत कर्जाचा प्रस्ताव दिला. बँकेकडून त्यांना ९ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले.

श्रमाचा सुगंध

नाव : मंगल लोंढे
व्यवसाय : अगरबत्ती उत्पादन

आज त्यांच्याकडे महिन्याला ६०० किलो अगरबत्तीचे उत्पादन होते. नवरा, दोन सुना त्यांना या व्यवसायात मदत करतात. रात्रंदिवस लोंढे कुटुंबीय राबत आहेत; मात्र आता त्यांच्या चेहऱ्यावर एक समाधान आहे.

रामनगर, वागळे इस्टेट येथे राहणाऱ्या मंगल कालिदास लोंढे पूर्वी एका कंपनीत अगरबत्ती हाताने वळण्याचे काम करत. आपणही अगरबत्तीचा व्यवसाय करावा हा विचार त्यांच्या मनात आला. महाबँकेच्या ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रात १५ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि भांडूप येथील परिचित व्यवसायिक राजेश सोनकर यांच्या मदतीने त्यांनी मशिनवर अगरबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण वसई येथे घेतले. अगरबत्तीचे मशिन सुमारे एक लाखाचे होते. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून मदत होऊ शकते असे त्यांना महाबँकेचे श्री परब यांनी सांगितले. मनाशी निश्चय करून मंगलताईंनी गुजरात गाठले. सगळी माहिती घेऊन त्या परतल्या. कच्चा मालही तुलनेने स्वस्त होता आणि स्थानिक पातळीवरच उपलब्ध होता. बँक ऑफ महाराष्ट्र मधून कर्ज घेऊन मंगलताईंनी मशिनची ऑर्डर नोंदवली.

आज त्यांच्याकडे महिन्याला ६०० किलो अगरबत्तीचे उत्पादन होते. नवरा, दोन सुना त्यांना या व्यवसायात मदत करतात. रात्रंदिवस लोंढे कुटुंबीय राबत आहेत; मात्र आता त्यांच्या चेहऱ्यावर एक समाधान आहे.

त्यांच्या श्रमाचे चीज झाले आहे, याचे संपूर्ण श्रेय ते प्रधानमंत्री मुद्रा योजना आणि महाबँकेला देतात.

विशीतच व्यवसायाचे आव्हान पेलले

नाव : शुभम बाफना
व्यवसाय : रसायननिर्मिती

पालघर जिल्ह्यातील शुभम बाफना हा २२ वर्षांचा युवक. वयाच्या विसाव्या वर्षी त्याने रसायननिर्मितीचा व्यवसाय सुरू केला. व्यवसायाच्या सुरुवातीचा काळ त्याच्यासाठी खडतर होता. २०१८ पर्यंत त्याच्या व्यवसायात खूपदा चढउतार आले. मार्केट असूनही भांडवल पुरेसे नसल्याने अडचणींचा सामना करावा लागला.

अखेरीस एका जाहिरातीतून मुद्रा योजनेची माहिती मिळाली. पालघर जिल्ह्यातील विजया बँकेच्या कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. कर्ज उपलब्ध झाल्यानंतर त्यानी रसायनांच्या निर्मितीची कक्षा वाढवत आणखी ४ नव्या रसायनांची त्यात भर घातली. ‘‘आज माझा टर्नओव्हर ५० लाखांवरून करोडच्या घरात पोहोचला आहे हे बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळेच!’’ हे सांगतानाच ‘‘या योजनेचा लाभार्थी म्हणून खूप फायदा झाला आहे. मुद्रा योजनेमुळे मी कमीत कमी व्याजदरातून माझा व्यवसाय चांगल्या प्रकारे वाढवू शकतो.’’ असेही तो नमूद करतो. ही योजना सर्वच लघु व मध्यम उद्योजकांसाठी अतिशय फायद्याची आहे असा त्याला विश्वास वाटतो.

आजच्या स्पर्धेच्या युगात व्यवसाय टिकवण्यासाठीही भांडवलाची गरज असते. व्यवसायाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक आर्थिक गरज मुद्रा योजनेमुळे पूर्ण होत असल्याचे शुभमचे मत आहे.

आज माझा टर्नओव्हर ५० लाखांवरून करोडच्या घरात पोहोचला आहे हे बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळेच!

केटरिंगमधून अर्थार्जन

नाव : शैला साठे

व्यवसाय : केटरिंग व झुणका भाकर केंद्र

उत्तम चवीचे व आरोग्यास पोषक असे घरगुती पदार्थ वाजवी दरात मिळाले, तर ग्राहक त्यांचा नक्कीच विचार करतील असा विचार करून पेणच्या शैला साठे यांनी 'जागृती उद्योग केंद्र' उघडले आहे.

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात बहुतेकांना कमी वेळात चविष्ट तसेच पौष्टिक अन्नपदार्थ हवे असतात. छोटे कुटुंब, त्यात पती पत्नी दोघेही नोकरीनिमित्त दिवसभर घराबाहेर असल्यामुळे स्त्रियांना मुलाबाळांकडे, घरातील कामांकडे पुरेसे लक्ष देणे शक्य होत नाही. अशा वेळी इन्स्टंट फूडची संकल्पना पुढे येऊन ती चांगलीच रुजली आहे. परंतु त्याचे मानवी आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होत आहेत. म्हणूनच उत्तम चवीचे व आरोग्यास पोषक असे घरगुती पदार्थ वाजवी दरात मिळाले, तर ग्राहक त्यांचा नक्कीच विचार करतील असा विचार करून पेणच्या शैला साठे यांनी 'जागृती उद्योग केंद्र' उघडले आहे. त्यांनी नाचणीची भाकरी, झुणका, दिवाळीचे पदार्थ, पापड, लोणची व इतर पदार्थ बनविण्याचा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायासाठी बँक ऑफ इंडिया पेण शाखेने आर्थिक साहाय्य केले म्हणूनच व्यवसायात प्रगती करता आली. अशी भावना शैला साठे यांनी व्यक्त केली.

त्यांनी बँक ऑफ इंडियाच्या पेण शाखेतून ३० हजार रुपयाचे कर्ज घेऊन पेण तहसिल कार्यालयाच्या आवारात झुणका भाकर केंद्र सुरू करून स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा एक यशस्वी प्रयत्न साकार केला आहे. त्यांना अनेक सरकारी कार्यालयांतून विविध कार्यक्रमांसाठी ऑर्डर्स दिल्या जातात. बँकेतून घेतलेल्या कर्जातून १५ हजार रुपयांची कर्जाची परतफेडदेखील केली आहे. मुद्रा अंतर्गत पेण शाखेतून त्यांनी आतापर्यंत २८ लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे.

स्वावलंबी बनवणारा लघुद्योग

नाव : पूजा चव्हाण

व्यवसाय : बॅग्जचे आणि पिशव्यांचे उत्पादन

पूजा दत्तप्रसाद चव्हाण, या कुँवारबाव, रत्नागिरी येथील रहिवासी आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्या किरकोळ शिवणकाम करत होत्या. एखादा व्यवसाय करून घराला आर्थिक हातभार लावावा, अशी त्यांची इच्छा होती. बचतगटाच्या माध्यमातून कापडी पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान त्यांना मुद्रा योजनेची माहिती मिळाली. त्यामुळे व्यवसाय सुरू करावा या हेतूने त्यांनी मुद्रा योजनेअंतर्गत बँक ऑफ इंडियाच्या कारवांचीवाडी शाखेत कर्ज प्रस्ताव सादर केला. बँकेने १ लाख रु. कर्ज मंजूर केले. त्या समोसा बॅग, प्रवासी बॅग, बनियन बॅग, शॉपिंग बॅग, छोटे पाऊच, साडी फोल्डर, फॅन्सी बॅग असे बॅगांचे विविध प्रकार तयार करू लागल्या. तयार केलेल्या पिशव्यांची विक्री करू लागल्या. त्यासाठी लागणारा कच्चा माल त्या स्वतः मुंबईतून आणत. त्यासोबतच त्यांना इमिटेशन दागिने बनवून त्यांच्या विक्रीची कल्पना सुचली आणि त्या दागिने बनवून विक्री करू लागल्या. सुरुवातीला विविध ठिकाणी होणाऱ्या महोत्सवात आठवडी बाजारात जाऊन कापडी पिशव्या व दागिने यांची विक्री करू लागल्या. नंतर त्यांनी घराशेजारी दुकान थाटून मालाची विक्री सुरू केली. याशिवाय त्या इतर गावांतील बचतगटातील महिलांना विक्रीसाठी माल पुरवू लागल्या, ज्याद्वारे इतर महिलांनासुद्धा त्यांनी रोजगार दिला आहे. सदर व्यवसायातून त्यांना दरमहा १०,०००/- एवढे निव्वळ उत्पन्न मिळते.

व्यवसाय सुरू करावा या हेतूने त्यांनी मुद्रा योजनेअंतर्गत बँक ऑफ इंडिया, कारवांचीवाडी शाखेत कर्ज प्रस्ताव सादर केला. बँकेने १ लाख रु. कर्ज मंजूर केले.

रंगांची उधळण झाली जीवनाची जोडीदार

नाव : मिलिंद कदम

व्यवसाय : रंगकाम

''व्याज दर कमी असल्याने कर्जाचे हप्ते सुलभरीत्या भरणे शक्य होते. यामुळे आमच्यासारख्या युवकांना नोकरीपेक्षा स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय उभारून जीवनाची वाटचाल सुसह्य करता आली आहे.''

सिंधुदुर्ग, रानबांबुळी येथील बौद्धवाडीचा रहिवासी मिलिंद कदम हा पंचवीस वर्षांचा युवक. रंगाच्या संगतीत रमणारा हा युवक घर-प्रपंच चालविण्यासाठी दुसऱ्याच्या हाताखाली मजुरीने काम करीत असे. दोन- तीन वर्षे या कामात तरबेज होऊनही आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्याला स्वतंत्र व्यवसाय सुरू करता येत नव्हता. पण स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची त्याची आकांक्षा कायम होती.

दरम्यान एका मित्राने त्याला पंतप्रधान मुद्रा योजनेतून कर्ज मिळेल अशी माहिती दिली. सिंधुदुर्ग येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत जाऊन मुद्रा योजनेची सविस्तर माहिती घेतली. अगदी अल्प व्याजदरात कोणतेही तारण न देता कर्ज मिळणार याचा त्याला विशेष आनंद झाला. ५० हजार रुपयांचे कर्ज मंजूर झाले. यामुळे रंगकामासाठी आवश्यक यंत्रसामग्री खरेदी करता आली. लांबी तयार करणे, स्प्रे पेंटींग, घोडे टेबल, शिडी यासारखी साधने घेतल्यावर उत्साह दुणावला.

आता तो स्वतः काम करायला लागल्याने महिन्याकाठी १० ते १५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळायला लागले आहे. ''व्याज दर कमी असल्याने कर्जाचे हप्ते सुलभरीत्या भरणे शक्य होते. यामुळे आमच्यासारख्या युवकांना नोकरीपेक्षा स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय उभारून जीवनाची वाटचाल सुसह्य करता आली आहे.'' असे तो सांगतो.

गारमेंट व्यवसायातून स्वप्नपूर्ती

नाव : आकाश अडागळे

व्यवसाय : कपड्यांचा व्यवसाय

एका कपड्यांच्या दुकानात आकाश ६ ते ७ हजार रुपये पगारावर काम करत होता. यात कुटुंबाचे कसेबसे भागत होते. त्यामुळे व्यवसाय करण्याचा विचार त्याच्या मनात घोळत असे. व्यवसाय करण्यासाठी या क्षेत्रातला आवश्यक तो अनुभवही त्याच्या गाठीशी जमा झाला होता. त्याच्याकडे थोडी स्वत:ची बचत आणि थोडी मित्रांकडून घेतलेली रक्कम असे भांडवल होते.

व्यवसायासाठी कर्ज घेण्यासंदर्भात माहिती घेण्यासाठी त्याने बँक ऑफ महाराष्ट्र च्या भवानी पेठ शाखेत संपर्क साधला. त्यावेळी त्याला मुद्रा योजनेअंतर्गत स्टॉक तयार करण्यासाठी ५० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले गेले.

आज आकाश घरोघर फिरून कपड्यांची विक्री करतो. स्थानिक मॉल्स तसेच ग्राहक पेठा आणि व्यापारी मेळे अशा ठिकाणी त्याला हमखास ग्राहक मिळतात. त्याच्या कष्टांमुळे त्याचा व्यवसाय हळूहळू बहरू लागला आहे. ५० हजाराचे कर्ज त्याने मुदतीआधीच फेडले असून आता त्याने २.२५ लाखाचे कर्ज नव्याने घेतले आहे.

मुद्रामुळे आणि बँक ऑफ महाराष्ट्रने केलेल्या तत्पर मदतीमुळे आकाशला आपले स्वप्न पूर्ण करता आले. त्यामुळे तो या दोहोंचा आभारी आहे.

आज आकाश घरोघर फिरून कपड्यांची विक्री करतो. स्थानिक मॉल्स तसेच ग्राहक पेठा आणि व्यापारी मेळे अशा ठिकाणी त्याला हमखास ग्राहक मिळतात. त्याच्या कष्टांमुळे त्याचा व्यवसाय बहरू लागला आहे.

मुद्रामुळे 'कमल इंडस्ट्री'ची यशस्वी वाटचाल

नाव : सीमा गवळी

व्यवसाय : संसारोपयोगी साहित्याची निर्मिती

मुद्रा योजनेत मिळालेल्या मदतीतून सीमा व अंगद यांनी कमल इंडस्ट्रीची स्थापना केली. यात त्यांना कुटुंबियांची मदत होते. यातून त्यांना महिन्याकाठी ६० ते ७० हजार रुपयांचा नफा हेतो.

लातूरच्या सीमा व अंगद यांनी सातारा येथे काही ठिकाणी मार्केटिंग केल्यावर गृहिणींना लागणाऱ्या सोपस्टॅन्डच्या निर्मितीस प्रारंभ केला. या वस्तू दुसरीकडून बनवून घेऊन त्याचे मार्केटींग सुरू केले. व्यवसाय वाढवण्यासाठी भांडवलाची गरज होती.

सीमा हिने बँक ऑफ महाराष्ट्रमधून मुद्रा योजनेतून २ लाखाचे कर्ज घेतले आणि घरीच कमल इंडस्ट्रीची स्थापना केली. धूपदाणी, अगरबत्तीदाणी, सोपस्टॅन्ड, दिवे, फ्रीजबॅग, आटाबॅग, सोपगार्ड अशा विविध वस्तूंची निर्मिती या माध्यमातून केली जाते. या वस्तूंना राज्यभरातून मागणी असते. त्यासाठी त्यांनी स्वत:चे मालवाहतूक वाहन घेतले आहे. यात स्वत:बरोबर इतरांनाही रोजगार देण्याचे समाधान मिळाल्याचे त्या सांगतात.

त्या म्हणतात, घरातील भांडी घासताना पाण्यात भिजून अनेकदा साबण वाया जातो. याचाच विचार करून सर्वप्रथम सोपस्टॅन्डची निर्मिती केली. यामध्ये साबण सुरक्षित राहतो व घासणीही ठेवता येते.

मुद्रा योजनेत मिळालेल्या मदतीतून सीमा व अंगद यांनी कमल इंडस्ट्रीची स्थापना केली. यात त्यांना कुटुंबियांची मदत होते. यातून त्यांना महिन्याकाठी ६० ते ७० हजार रुपयांचा नफा हेतो.

शासनाची मुद्रा बँक योजना अतिशय लाभदायी असून बेरोजगारांनी, विशेषत: स्त्रियांनी, याचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्या करतात.

वॉटरप्रूफिंगमधून संपत्तीनिर्मिती

नाव : चेतन माने

व्यवसाय : वॉटरप्रूफिंग

चेतन माने यांनी चार ते पाच वर्षे किराणा मालाचे दुकान चालवले. परंतु, त्यामध्ये त्यांना मोठा तोटा सहन करावा लागला. मग त्यांनी सुधीर चौगुले यांच्याकडे वॉटरप्रूफिंगचे धडे गिरवून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली वॉटप्रूफिंगचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. १० वर्षे हा व्यवसाय करूनही त्यांच्याकडे काहीच भागभांडवल नव्हते. पैशाअभावी बऱ्याचदा अडचणी यायच्या.

यावर मात करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी त्यांनी कर्ज घ्यायचा विचार केला. त्यावेळी त्यांना बँक ऑफ इंडियाच्या गावभाग शाखेतून मुद्रा योजनेची माहिती मिळाली.

आवश्यक कागदपत्रे पूर्ण केल्यानंतर त्यांना दीड लाख रुपये कर्ज मिळाले. व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी या कर्जाची मदत झाली.

आज त्यांचा वॉटरप्रूफिंगचा व्यवसाय बहरला आहे. त्यांच्या फर्मच्या माध्यमातून टेरेस स्लॅब व भिंतीमधील क्रॅक्स, कूल कोटिंग, सिमेंट पत्रे व अन्य सर्व प्रकारची वॉटरप्रूफिंगची कामे केली जातात. विठ्ठल मंदिर, पंढरपूर, मुंबई, पुणे, नाशिकसह गोवा, कर्नाटकमधील अथणी, विजापूर, बंगळुरू, आंध्र प्रदेशमधील गुंटक्कल या ठिकाणी त्यांनी वॉटरप्रूफिंगची कामे केली आहेत.

हे सर्व मुद्रा योजनेमुळेच शक्य झाले अशी त्यांची भावना आहे.

आज चेतन माने यांचा वॉटरप्रूफिंगचा व्यवसाय बहरला आहे. त्यांच्या फर्मच्या माध्यमातून टेरेस स्लॅब व भिंतीवरील क्रॅक, कूल कोटिंग, सिमेंट पत्रे व अन्य सर्व प्रकारची वॉटरप्रूफिंगची कामे केली जातात.

सलून व्यवसायातून रोजगारनिर्मिती

नाव : किरण भोसले व अमित भोसले

व्यवसाय : सलून

आज त्यांच्याकडे तीन सलून चेअर्स असून या परिसरातील एक अद्ययावत सलून म्हणून प्रसिद्धी मिळाली. या व्यवसायाच्या निमित्ताने त्यांनी नवीन रोजगारांची निर्मितीदेखील केली आहे.

किरण नामदेव भोसले व अमित दामोदर भोसले हे दोघेही केशकर्तन कारागीर म्हणून काम करत होते. स्वतःचे सलून सुरू करण्याचे त्यांच्या मनात होते, परंतु भांडवलाअभावी त्यांना ते शक्य नव्हते. त्यांनी नोव्हेंबर २०१७ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा साळवण येथे संपर्क साधला व रुपये ६.७० लाखाचा प्रस्ताव सादर केला. यामध्ये बँकेकडून रुपये ५ लाख व स्वभांडवल रू. १.७० लाख असा प्रस्ताव होता.

बँक अधिकाऱ्यांनी व्यवसायाच्या ठिकाणी पाहणी केल्यावर या होतकरू नवयुवकांना पंतप्रधान मुद्रा किशोर योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले व स्वतंत्र व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली.

मिळालेल्या संधीचा लाभ उठवत या तरुणांनी एप्रिल २०१८ मध्ये ओम जेन्टस् पार्लरचे उद्घाटन करून व्यवसायास सुरुवात केली. आज त्यांच्याकडे तीन सलून चेअर्स असून या परिसरातील एक अद्ययावत सलून म्हणून प्रसिद्धी मिळाली. या व्यवसायाच्या निमित्ताने त्यांनी नवीन रोजगारांची निर्मितीदेखील केली आहे. आज त्यांची रोजची कमाई रुपये २५०० ते ३००० इतकी आहे. या यशाचे श्रेय त्यांनी प्रधानमंत्री मुद्रा योजनेला दिले आहे.

हस्तकलेतून 'अर्थ' गवसला



नाव : नूतन चवरे

व्यवसाय : रुखवताच्या वस्तू

सोलापूर येथील नूतन अतिश चवरे या लहानपणापासूनच कलाकार. एखादी वस्तू पाहताच त्या ती हुबेहूब बनविण्याचा प्रयत्न करीत व त्यात यशस्वीही होत असत. यामुळेच मार्गदर्शक अर्चना तिवारी यांनी त्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी लग्नातील रुखवत बनवायला सुरुवात केली. परंतु पुरेशा भांडवलाअभावी त्या मोठ्या प्रमाणात व्यवसाय करू शकत नव्हत्या.

दरम्यान त्यांना मुद्रा कर्ज योजनेबद्दल कळल्याने बँक ऑफ इंडिया, रेल्वे लाईन्स शाखेकडे कर्जासाठी प्रस्ताव दिला. बँकेने मंजूर केलेल्या १ लाख ६० हजार रुपयांमुळे त्यांना खूप फायदा झाला. दर आठवड्याला सर्व खर्च वगळता २०-२५ हजार रुपये मिळत असल्याने त्या उत्पन्नातून त्यांना ४-५ महिन्यात माल पॅकींगची मशिनरीही खरेदी करता आली. सध्या नूतन यांच्याकडे ३५-४० विडी कामगार महिला विडीकाम सोडून रुखवताच्या वस्तू बनवतात व त्यातून १ महिला दिवसाला २००-३०० रुपयांचे काम करते. नूतन चवरे यांच्या मालाची सध्या औरंगाबाद, माळशिरस, नाशिक, बार्शी, मंगळवेढा, पंढरपूर, अकलूज इ. ठिकाणी नियमित विक्री होत आहे. काही व्यापारी तर स्वत: सोलापूर येथे येऊन माल घेतात.

बँक ऑफ इंडियाने नूतन यांना वारंवार मदत करून त्यांची आर्थिक गरज भागवली आहे त्यामुळे त्या बँकेचे आभार मानतात.

सध्या नूतन यांच्याकडे ३५-४० विडी कामगार महिला विडीकाम सोडून रुखवताच्या वस्तू बनवतात व त्यातून १ महिला दिवसाला २००-३०० रुपयांचे काम करते.

चहाच्या स्टॉलने आयुष्य बदलले

नाव : ज्योती घुगे

व्यवसाय : टी स्टॉल

आज सदर चहाच्या स्टॉलच्या माध्यमातून त्या दर महिन्याला ९ ते १० हजार रुपये कमावतात. त्यातून त्यांचा घरखर्च व मुलांच्या शिक्षणावरचा खर्चदेखील भागतो.

ज्योती प्रकाश घुगे या नाशिक शहरातील महात्मा गांधी रोड येथे राहणाऱ्या सर्वसामान्य गृहिणी आहेत. कुटुंबात ३ प्रौढ व २ चिमुरडी मुले असून उत्पन्नाची साधने मर्यादित होती. त्यामुळे घरातील आर्थिक परिस्थिती कायमच ओढाताणीची होती. उपजीविकेसाठी काहीतरी मार्ग शोधणे गरजेचे होते. त्यावेळी ज्योती यांना मुद्रा योजनेची माहिती मिळाली आणि काहीतरी करण्याच्या त्यांच्या आशा पल्लवित झाल्या.

मग त्यांनी जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत मुद्रा योजनेअंतर्गत शिशुगटात चहा स्टॉल सुरू करण्यासाठी रु. ४०,००० कर्ज घेण्यासाठी अर्ज केला. त्यांना बँकेकडून कर्ज मंजूरही झाले. आज सदर चहाच्या स्टॉलच्या माध्यमातून त्या दर महिन्याला ९ ते १० हजार रुपये कमावतात. त्यातून त्यांचा घरखर्च व मुलांच्या शिक्षणावरचा खर्चदेखील भागतो. तसेच कर्जाच्या हप्त्यांची रक्कम देऊनही त्यांची बचत होते. हे केवळ मुद्रा योजनेमुळे शक्य झाल्याचे ज्योती आवर्जून सांगतात.

विद्युत उपकरणांच्या दुकानाने दिला उपजीविकेचा मार्ग

नाव : लक्ष्मण नांगरे

व्यवसाय : विद्युत उपकरणांचे दुकान

नोकरीसारखा पारंपरिक पर्याय न स्वीकारता स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा पर्याय स्वीकारू इच्छिणाऱ्या अनेक युवकांपैकी एक म्हणजे अहमदनगर येथील येथील लक्ष्मण नांगरे. कल्याण-विशाखापट्टणम महामार्गावर तिसगाव या ठिकाणी लक्ष्मण यांचे 'मातोश्री इलेक्ट्रिकल्स' हे विद्युत उपकरणांचे दुकान आहे. त्यांनी त्यांच्या व्यवसायाची सुरुवात अगदी छोट्या दुकानापासून केली. त्यांना व्यवासाय वाढीसाठी भांडवलाची गरज होती म्हणून सेंट्रल बँकेच्या तिसगाव शाखेत त्यांनी कर्ज मिळण्यासाठी अर्ज सादर केला.

त्यावेळी त्यांना केंद्र सरकारच्या मुद्रा योजनेबद्दल समजले. व्यवसाय वाढवण्यासाठी त्यांनी योजनेअंतर्गत कर्ज घ्यायचे ठरवले. त्यांना बँकेने मुद्राअंतर्गत २ लाखांचे कर्ज मंजूर केले.

कर्जाची रक्कम मिळाल्यावर लक्ष्मण यांनी दुकानासाठी आवश्यक असणारी सामग्री खरेदी केली व दुकानाला नवीन स्वरूप दिले. नांगरे दुकानात विद्युत उपकरणे फक्त विक्रीसाठीच ठेवत नाहीत तर या उपकरणांची दुरुस्तीही करतात. त्यांच्या या दुकानात उत्तम दर्जाची अनेक नित्योपयोगी उपकरणे मिळत असल्याचे त्यांचे ग्राहक सांगतात.

नांगरे यांना बँकेने मुद्राअंतर्गत २ लाखांचे कर्ज मंजूर केले. कर्जाची रक्कम मिळाल्यावर त्यांनी दुकानासाठी आवश्यक असणारी सामग्री खरेदी केली व दुकानाला नवीन स्वरूप दिले.

मुद्राने आर्थिक 'दोर' बळकट केले...

नाव : संदीप पाटील

व्यवसाय : नायलॉन आणि सुती दोर तयार करणे



कर्जाच्या रकमेतून त्यांनी रामनगर, धुळे येथे नायलॉन व सुती दोर तयार करण्याचा कारखाना सुरू केला. आज हा कारखाना अतिशय चांगल्या प्रकारे सुरू आहे.

कर्ज घेण्याआधी संदीप पाटील नायलॉन व सुती दोराच्या दुकानात सेल्समन म्हणून काम करत होते. तेथे त्यांना अतिशय कमी उत्पन्न मिळत होते, ज्यामध्ये ते आपल्या कुटुंबाच्या गरजा जेमतेमच पूर्ण करू शकत असत. व्यवसाय सुरू करण्याचे विचार मनात होतेच. त्यासंदर्भात एकदा सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मार्केटयार्ड शाखा येथे कर्जासाठी गेले असता त्यांना मुद्रा योजनेची माहिती झाली आणि अंधारात चाचपडताना एकाएकी प्रकाशकिरण दिसावा तसे झाले.

अर्ज व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना नायलॉन व सुती दोर तयार करण्याचा कारखाना सुरू करण्यासाठी मुद्रा योजनेअंतर्गत २ लक्ष रुपयांचे कर्ज ऑगस्ट २०१६ मध्ये मंजूर झाले. कर्जाच्या रकमेतून त्यांनी रामनगर, धुळे येथे नायलॉन व सुती दोर तयार करण्याचा कारखाना सुरू केला.

आज हा कारखाना अतिशय चांगल्या प्रकारे सुरू आहे. त्यामुळे त्यांना केवळ उदरनिवाहाचे साधनच मिळाले नसून सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडण्याइतपत आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. त्यांच्या दोन मुलांचे शिक्षण अतिशय चांगल्या प्रकारे सुरू आहे. त्यांना आता दरमहा रु. २५ हजार पेक्षा जास्त उत्पन्न मिळत आहे आणि भविष्यात ते आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. मुद्रा बँक योजनेतून मिळालेल्या कर्जामुळेच एवढे शक्य झाले या शब्दात त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

गिरीश झाला फोटो स्टुडिओचा मालक

नाव : गिरीश पाटील

व्यवसाय : फोटोग्राफी

गिरीश पाटील हा शहादा तालुक्यातील करणखेडा येथील तरुण, १२ वी पर्यंत शिकलेला, कौटुंबिक परिस्थिती बेताची असलेला. गिरीशला फोटोग्राफीची आवड होती. अशातच त्याला भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, नंदूरबार या संस्थेची माहिती मिळाली. या प्रशिक्षण संस्थेत बेसिक फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफीचे प्रशिक्षण त्याने पूर्ण केले व फोटोग्राफीचा व्यवसाय करायचे ठरवले. मात्र त्याच्याकडे पुरेसे भांडवल नव्हते. आऊटडोअर फोटोग्राफीतून मिळालेल्या पैशातून शूटींगचा कॅमेरा घेतला. मात्र त्याच्याकडे संगणक विकत घेण्यासाठी भांडवल नव्हते. आरसेटीचे संचालक संजय धामणकर यांनी प्रधानमंत्री मुद्रा योजनेत त्याचे कर्ज प्रकरण पाठविले. आणि ५० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. गिरीशने जगतापवाडी, नंदूरबार येथे स्माईल फोटो स्टुडिओ या नावाने फोटो स्टुडिओ सुरू केला. या परिसरात स्टुडिओ नसल्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणावर फोटोग्राफीचे काम मिळू लागले.

आज गिरीश महिन्याला २० ते २५ हजार कमवितो. त्याला आरसेटी मध्ये फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफीसाठी तांत्रिक प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले आहे.

गिरीश या यशाचे श्रेय भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, नंदूरबार यांना देतो.

गिरीशने जगतापवाडी, नंदूरबार येथे स्माईल फोटो स्टुडिओ या नावाने फोटो स्टुडिओ सुरू केला. या परिसरात स्टुडिओ नसल्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणात फोटोग्राफीचे काम मिळू लागले.

मुद्राने सोपे केले जगणे

नाव : सुहास पाटील

व्यवसाय : मेकॅनिकल वर्कशॉप

कर्जाची रक्कम मिळताच त्यांनी आत्मविश्वासाने कामास सुरुवात केली. अवजारे व वर्कशॉप यांत सुधारणा केली. नंतर काही कालावधीने ट्रॅक्टर वेल्डींगसह ते नांगर, पेरणी, रोटा हीटर इ. यंत्रे ते स्वत: तयार करायला लागले.

जळगाव येथे राहणाऱ्या सुहास जिजाबराव पाटील यांचे एक छोटे वेल्डींग वर्कशॉप होते. पण वेल्डींग मशिन नसल्याने एका पतसंस्थेकडून ३० हजारांचे कर्ज घेतले. मग मशिन खरेदी करून नंतर त्या कर्जाची परतफेडही केली. त्यांच्याकडे ड्रिल मशिन व काही अवजारे असली तरी निधीची कमतरता सातत्याने जाणवत होती. परिणामी ते फक्त ट्रॅक्टर वेल्डींगचे काम करत. याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर झाला. दिवसातून २-३ ग्राहक मिळत असत. त्यांचे छोटेसे वर्कशॉप असल्याने त्यांना गरजेइतकेही उत्पन्न त्यातून मिळत नसे. काही दिवसांनी सुहास त्यांच्या गावातील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ममुराबाद शाखा येथे आले असताना त्यांना मुद्रा लोनबद्दल समजले. त्यांनी मुद्राअंतर्गत २ लाख ९५ हजार रुपयांचे कर्ज घेतले. कर्जाची रक्कम मिळताच त्यांनी आत्मविश्वासाने कामास सुरुवात केली. अवजारे व वर्कशॉप यांत सुधारणा केली. नंतर काही कालावधीने ट्रॅक्टर वेल्डींगसह ते नांगर, पेरणी, रोटा हीटर इ. यंत्रे ते स्वत: तयार करायला लागले. ह्या यंत्राची निर्मिती अशाप्रकारे केली, की शेतात ते बंद पडल्यास वा नादुरुस्त झाल्यास ते पार्टस् तिथेच टाकून दुरुस्त करता येतील. त्यांनी बनविलेल्या या यंत्राची दखल कृषी खात्यानेही घेतली. मुद्रा योजनेमुळे सुहास पाटील यांचा खूप फायदा झाला असून याबद्दल ते सरकारचे आभार मानतात.

रिक्षाने दिले उदरनिर्वाहाचे साधन

नाव : हृषिकेश बनकर

व्यवसाय : रिक्षा चालवणे

कर्ज घेण्याआधी राऊळगाव रेल्वे स्टेशन, औरंगाबाद येथे राहणारे हृषिकेश अशोक बनकर इतरांच्या मालकीची रिक्षा चालवून उदरनिर्वाह करत होते. अर्थातच यामधून त्यांना अतिशय अल्प उत्पन्न मिळत होते, ज्यामध्ये ते आपल्या कुटुंबाच्या गरजा जेमतेमच पूर्ण करू शकत असत. मात्र हे करतानाही त्यांनी जमेल तशी बचत करण्याचा प्रयत्न सतत चालू ठेवला. एकीकडे स्वत:ची रिक्षा घेण्याचे डोक्यात विचार चालू होतेच. त्याच कालावधीत त्यांना प्रधानमंत्री मुद्रा योजनेची माहिती झाली आणि आशेचा किरण दिसला.

अर्ज व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना मुद्रा योजनेंतर्गत कर्ज मंजूर झाले. कर्जाच्या रकमेतून त्यांनी नवी रिक्षा इएमआय चे हप्ते भरून विकत घेतली आहे.

आज स्वत:ची रिक्षा असल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे. त्यामुळे त्यांना केवळ उदरनिवाहाचे साधनच मिळाले नसून सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडणे शक्य होत आहे. त्यामुळे कौटुंबिक आघाडीवरही समाधान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. मुद्रा योजनेतून मिळालेल्या कर्जामुळेच एवढे शक्य झाले असे म्हणून त्यांनी शासनाला धन्यवाद दिले आहेत.

आज स्वत:ची रिक्षा असल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे. मुद्रा योजनेतून मिळालेल्या कर्जामुळेच एवढे शक्य झाले असे म्हणून त्यांनी त्याबद्दल शासनाला धन्यवाद दिले आहेत.

आवळा प्रक्रिया उद्योगातून स्थैर्याची हमी

नाव : संजीवनी जाधव

व्यवसाय : आवळा प्रक्रिया

केवळ १० हजार रुपयांपासून सुरू केलेल्या आवळा प्रक्रिया व्यवसायाची वार्षिक उलाढाल २० ते २५ लाख रुपयांपर्यंत गेली आहे.

आयुर्वेद तसेच दैनंदिन जीवनामध्ये आवळा या फळाचे असंख्य उपयोग आहेत. मुद्रा योजनेच्या माध्यमातून कर्ज घेऊन आवळ्याच्या व्यवसायातून संजीवनी जाधव यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे.

सासरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांनी शेजारील महिलांना एकत्र करून बचतगटाची स्थापना केली. जालना तालुक्याल्या खरपुडी येथे आवळा प्रक्रिया उद्योगाचे पाच दिवसांचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी व्यवसाय सुरू केला. तयार केलेल्या मालाला बाजारपेठेतून मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली. वाढत्या मागणीप्रमाणे माल तयार करून देण्यासाठी कच्च्या मालाची आवश्यकता होती. कच्चा माल विकत घेण्यासाठी व प्रक्रिया करण्यासाठी पंतप्रधान मुद्रा बँक योजनेची मदत झाली. जालना येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्या व्यवस्थापकांनी त्यांना व्यवसायासाठी ४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. केवळ १० हजार रुपयांपासून सुरू केलेल्या आवळा प्रक्रिया व्यवसायाची वार्षिक उलाढाल २० ते २५ लाख रुपयांपर्यंत गेली आहे. या उद्योगाच्या माध्यमातून त्यांना आपल्या दोन मुलींना उच्च शिक्षण देऊन त्यांच्या पायावर उभे करता आले आहे. मुद्रा योजनेमुळेच मी माझ्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावून समाजामध्ये सन्मानाने जगत आहे, असे त्या सांगतात.

अर्चनाताईंच्या आवडीला मुद्राचे बळ

नाव : अर्चना सूर्यवंशी

व्यवसाय : वेशभूषांचे ड्रेसेस

अर्चना नितीन सूर्यवंशी यांना लहानपणापासूनच ड्रेस डिझायनिंगची आवड. पतीनिधनानंतर अर्चना यांनी मुलांच्या भविष्यासाठी स्वत:ची आवड लक्षात घेऊन रेडिमेड ड्रेस विक्रीचा घरगुती व्यवसाय सुरू केला. फर्मची नोंदणी करून त्याचे बँकेत खाते काढून घेतले. व्यवसाय वाढवण्यासाठी भांडवलाची गरज होती. त्याचवेळी त्यांना मुद्रा योजनेबद्दल समजले. त्यांनी बँकेत जाऊन या योजनेबद्दल माहिती घेतली. कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर बँकेने त्यांना ५ लाखांचे कर्ज मंजूर केले. त्यातून त्यांनी ड्रेसबरोबर शाळा, महाविद्यालयात होणाऱ्या गॅदरिंगसाठी लागणाऱ्या विविध वेषभूषांचा व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. अशा ड्रेसेसची मागणी लक्षात घेऊन त्यांनी थेट मोठी बाजारपेठ गाठली व विविध प्रकारच्या वेशभूषांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली. हा व्यवसाय चांगल्या रितीने फुलला आहे. अर्चना यांनी आज या व्यवसायात स्वत:सह इतर पंधरा भगिनींना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यांनी या सर्व यशाचे श्रेय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या मुद्रा योजनेला दिले आहे. ही योजना खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचा मार्ग असून या योजनेतून तारण, जामीन अशा किचकट प्रक्रियेशिवाय मिळणारे कर्ज म्हणजे बेरोजगार तरुणाईसाठी राजमार्ग असल्याचे त्या सांगतात.

कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर बँकेने त्यांना ५ लाखांचे कर्ज मंजूर केले. त्यातून त्यांनी ड्रेसबरोबर शाळा, महाविद्यालयात होणाऱ्या गॅदरिंगसाठी लागणाऱ्या विविध वेषभूषांचा व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला.

केटरिंग व्यवसायाने तारले

नाव : अंकुश नलावडे
व्यवसाय : केटरिंग सर्व्हिस

कर्जाच्या रकमेतून अंकुश यांनी हॉटेल व्यवसायासाठी साहित्य खरेदी केले व चहासोबत नाश्त्याचीही विक्री सुरू केली. त्याचप्रमाणे फ्रिज विकत घेऊन कोल्ड्रिंक व पाण्याच्या बाटलीचीही विक्री सुरू केली.

काही व्यवसाय कायम 'डिमांड' मध्येच असतात. जगात कितीही उलथापालथ होवो, तेजीमंदी येवो, हे व्यवसाय निगुतीने केले तर हमखास चालतातच. केटरिंग म्हणजेच खानपान सेवा हा यापैकीच एक.

बीड जिल्ह्यातील रहिवासी अंकुश गुलाबराव नलावडे हे ४५ वर्षांचे गृहस्थ सुरुवातीला बीडमधील मोंढा रोड येथे छोटी चहाची टपरी चालवीत होते. मात्र त्यातून त्यांचे व्यवस्थित भागत नसे. त्यामुळे व्यवसाय वाढवायला हवा हे त्यांना कळत होते.

दरम्यान त्यांना मुद्रा योजनेबद्दल समजले व त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक, बीड शाखा यांचेकडून रु. ७०,०००/- कर्ज घेतले. त्यापैकी रु. ५०,०००/- मुदतीचे कर्ज व रु. २०,००० कॅश क्रेडिट कर्ज घेतले. त्यातून त्यांनी हॉटेल व्यवसायासाठी साहित्य खरेदी केले व चहासोबत नाश्त्याचीही विक्री सुरू केली. त्याचप्रमाणे फ्रिज विकत घेऊन कोल्ड्रिंक व पाण्याच्या बाटलीचीही विक्री सुरू केली. कर्जाची नियमितपणे परतफेड करून त्यांनी बँकेसोबतही चांगले संबंध निर्माण केले.

आज व्यावसायिक प्रगती झाल्याने ते मुद्रा योजना आणि बँक यांचे आभारी आहेत.

चुलीपलिकडले विश्व गवसले



नाव : नसरीन शेख

व्यवसाय : ब्युटी पार्लर

उस्मानाबाद येथील नसरीन शेख या लग्नानंतर उस्मानाबाद येथे पतीसमवेत राहण्यात आल्या. लग्नानंतर सुरुवातीला घरीच होत्या. चूल व मूल यापलिकडे त्यांचे विश्व नव्हते. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. त्यांच्या पतीची कमाईही फार नव्हती. अशा परिस्थितीत घरी बसून राहणे त्यांना अवघड जात होते. म्हणून त्यांनी स्वत:चे पार्लर सुरू करण्याचा विचार केला व त्यासाठीचे १ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले. सुरुवातीला एका खासगी संस्थेकडून पार्लरसाठी कर्ज घेतले. सुरुवातीचे त्यांचे उत्पन्न १० हजारांपर्यंत होते. त्यानंतर त्यांनी त्यांच्या व्यवसायाचा विस्तार करण्याचे ठरवले. उस्मानाबादच्या बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये नसरीन यांना मुद्रा योजनेबद्दल माहिती मिळाली. या काळात बँकेच्या लोकांनी त्यांना सहकार्य करत साडेनऊ लाखांचे कर्ज मंजूर केले. या योजनेमुळे त्या स्वत:चे घर बांधू शकल्या. घरातही आर्थिक स्थिरता प्राप्त झाली. काही कालावधीनंतर त्यांनी राहत असलेल्या घराजवळच पार्लर सुरू केले. या ठिकाणीही त्यांना ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आजमितीला नसरीन ह्यांनी स्वत:च्या पार्लरबरोबरच फिटनेस सेंटर सुरू केले असून त्या तयार कपड्यांचीही विक्री करतात. तसेच त्या मुलींना पार्लरचे प्रशिक्षणही देतात. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''या सगळ्या प्रवासात घरच्या मंडळींनी खूप आधार दिला.'' या लोनच्या आधारे सुरू केलेल्या व्यवसायावर त्यांना महिना २५-३० हजार उत्पन्न मिळते.

आजमितीला नसरीन ह्यांनी स्वत:च्या पार्लरबरोबरच फिटनेस सेंटर सुरू केले असून त्या तयार कपड्यांचीही विक्री करतात. तसेच त्या मुलींना पार्लरचे प्रशिक्षणही देतात.

बेन्टेक्स ज्वेलरीतून उत्कर्ष

नाव : दुर्गा बद्रीकाल

व्यवसाय : बेन्टेक्स ज्वेलरीचे दुकान



दुकानात विविध प्रकारची ज्वेलरी मिळत असल्याने दुकानात ग्राहकांची गर्दी कायम असे. या कामात त्यांना त्यांचा मुलगा मदत करतो. हे दुकान सुरू करताना त्यांनी एक लाख रुपये कर्ज घेतले व ते कर्ज पूर्णपणे फेडले.

परभणी येथे राहणाऱ्या दुर्गा विठ्ठलराव बद्रीकाल यांनी सन २०१७ मध्ये स्वत:चे बेंटेक्स ज्वेलरीचे दुकान सुरू केले. त्यांच्या दुकानात विविध प्रकारची ज्वेलरी मिळत असल्याने दुकानात ग्राहकांची गर्दी कायम असे. या कामात त्यांना त्यांचा मुलगा मदत करतो. हे दुकान सुरू करताना त्यांनी एक लाख रुपये कर्ज घेतले व ते कर्ज त्यांनी पूर्णपणे फेडले. नंतर त्यांनी व्यवसायवाढीचा विचार करत बँक ऑफ बडोदाकडे ८ लाखांच्या कर्जाची मागणी केली व बँकेनेही त्यांचा पूर्वानुभव लक्षात घेऊन विना सिक्युरिटी, विना तारण ८ लाखांचे कर्ज २-३ दिवसात मंजूर केले. कर्ज मिळाल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याने त्यांच्या दुकानातील गर्दीचा ओघ निरंतर वाढतच आहे. त्यांच्या या दुकानात दुर्गा स्वत:, त्यांची मुलगी व मुलगा अशा तिघांनाही यामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे.

दुर्गा कर्जाच्या परतफेडीबाबत काटेकोर व प्रामाणिक आहेत. त्या कर्जाचे हप्ते दरमहा भरत आहेत.

गरजांची पूर्तता झाली

नाव : कैलास चुडेवार

व्यवसाय : किराणा मालाचे दुकान

कैलास चुडेवार हे नांदेडमध्ये मुदखेड येथे राहत असून त्यांचे तेथे किराणा मालाचे दुकान आहे. दुकानाच्या विस्तारासाठी कैलास यांना भांडवलाच्या कमतरतेचा प्रश्न भेडसावत होता. त्यादरम्यान त्यांना केंद्र सरकारच्या मुद्रा लोन योजनेबद्दल समजले. त्यांनी लगेचच स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुदखेड शाखेत कर्जाचा प्रस्ताव दिला. बँकेकडून त्यांना एक लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. त्यांना याप्रकरणी बँकेच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. कर्जाची रक्कम मिळाल्यावर त्यांनी व्यवसायविस्ताराचे ध्येय पूर्ण करण्याच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. त्यासाठी आवश्यक गोष्टींची पूर्तता केली. या योजनेमुळे त्यांना व्यवसायवृद्धी करणे शक्य झाले. या योजनेबद्दल ते सरकारचे मनापासून आभार व्यक्त करतात. ही योजना नवउद्योजकांसाठी खूप चांगली आहे असे त्यांचे मत आहे.

कर्जाची रक्कम मिळाल्यावर त्यांनी व्यवसाय विस्ताराचे ध्येय पूर्ण करण्याच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. त्यासाठी आवश्यक गोष्टींची पूर्तता केली. या योजनेमुळे त्यांना व्यवसायवृद्धी करणे शक्य झाले.

छोटे उद्योग, अर्थार्जनाचा योग

नाव : मनकर्णा सोंडगीर

व्यवसाय : स्त्रियांची वस्त्रे, साड्या आणि बांगड्या किरकोळ विक्री व्यवसाय

मनकर्णा यांनी आर सेटी उपक्रमांतर्गत स्टेट बँक हिंगोली शाखा येथे ६ दिवसांचे जनरल ईडीपीचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या मार्गदर्शनामुळे चालू असलेल्या व्यवसायाचाच विस्तार करण्याचे त्यांच्या मनात आले.

हिंगोली जिल्ह्यातील मु. पो. सावरखेडा येथे राहणाऱ्या मनकर्णा सोंडगीर या एक सर्वसामान्य गृहिणी असून त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची आहे. त्यांचे पती दुसऱ्याच्या शेतात मजुरी करतात. संसाराला हातभार लावण्यासाठी त्या गेल्या ५ वर्षांपासून बांगड्या विकण्याचा व्यवसाय करत आहेत. मात्र त्यातूनही जेमतेमच भागत असल्याने त्यांना चरितार्थासाठी अधिक काहीतरी करण्याची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी आर सेटी उपक्रमांतर्गत स्टेट बँक हिंगोली शाखा येथे ६ दिवसांचे जनरल ईडीपीचे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या मार्गदर्शनामुळे चालू असलेल्या व्यवसायाचाच विस्तार करण्याचे त्यांनी ठरवले. त्यासाठी मुद्रा योजनेची मदत झाली.

व्यवसायाच्या विस्तारासाठी त्यांना १ लाख रुपये कर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा हिंगोलीने दिले. बांगड्यांच्या बरोबरच साडी, पेटीकोट, ब्लाऊजपीस, लहान मुलांचे ड्रेसेस इत्यादी गोष्टी त्या गावोगावी जाऊन विकतात. सध्या त्यांना या व्यवसायातून १५००० ते २२००० दरमहा मिळतात.

त्याबद्दल त्या ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्राला आणि मुद्रा योजनेला मनापासून धन्यवाद देतात.

उमेशच्या लढाईला मुद्राचे बळ

नाव : उमेश बडोदे

व्यवसाय : मूर्तिकाम

अचलपूरमध्ये नशीबपुऱ्यात राहणाऱ्या उमेश रामप्रसाद बडोदेवर शिक्षण पूर्ण होताच कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. तो शहरातल्या ऑईल मिलमध्ये काम करू लागला. दुर्दैवाने तेथे त्याचा हात यंत्रात अडकून धडावेगळा झाला. चहूबाजूंनी अडचणी उभ्या राहिल्या. लहानपणच्या मूर्ती घडवण्याच्या छंदाचेच व्यवसायात रूपांतर करण्याचे त्याने ठरवले आणि मग सुरू झाली एका हाताची लढाई. मूर्तिकलेचा व्यवसाय हळूहळू आकार घेऊ लागला. पण व्यवसाय चालवण्यासाठी निधीची गरज होती. मग उमेशने बँकेची मदत घेण्याचे ठरवले. सुरुवातीला पाच- दहा हजारांपेक्षा जास्त रक्कम द्यायला कुणी तयार होईना. अशा परिस्थितीत उमेशला मुद्रा बँक योजनेची माहिती मिळाली. लहान उद्योगांसाठी अर्थसाहाय्याची तरतूद या योजनेत असल्याने उमेशला सेंट्रल बँकेतून ५० हजार रुपये मिळाले. यातून त्याने कच्चा माल, साचे आदी गोष्टी खरेदी केल्या व मोठ्या प्रमाणावर मूर्ती बनवायला सुरुवात केली.

आता तो महालक्ष्मी, श्रीकृष्ण, गणपती तसेच महापुरुषांच्या मूर्तीही तो बनवतो. तसेच सिमेंटच्या चुली, पाण्याचे टाके, मूर्तीचे मुखवटे, रबरी साचे या वस्तूही तो तयार करून विकतो.

या व्यवसायात तो आता स्थिरावलाय. याचे श्रेय तो मुद्रा योजनेला देतो.

लहान उद्योगांसाठी अर्थसाहाय्याची तरतूद मुद्रा योजनेत असल्याने उमेशला सेंट्रल बँकेतून ५० हजार रुपये मिळाले. यातून उमेशने कच्चा माल, साचे आदी गोष्टी खरेदी केल्या व मोठ्या प्रमाणावर मूर्ती बनवायला सुरुवात केली.

झेरॉक्स व स्टेशनरी व्यवसायाने भरभराट

नाव : प्रमोद कोलते

व्यवसाय : झेरॉक्स व स्टेशनरी व्यवसाय

प्रमोद यांना बँकेकडून ८० हजार रूपये कर्ज मिळाले. यातून त्यांनी झेरॉक्स मशिन व स्टेशनरी सामान खरेदी करून व्यवसाय सुरू केला. गावात दुसरे झेरॉक्स मशिन नसल्याने त्यांना रोज ५०० ते ६०० रुपयांची कमाई सुरू झाली.

पाडळी येथील प्रमोद महादू कोलते यांचे गावात छोटे दुकान होते, ज्यातून त्यांना दररोज १०० ते १५० रुपयांची कमाई होत होती. या तुटपुंज्या उत्पन्नात घरखर्च भागत नसल्याने ते दुकान बंद करून रोजंदारीवर जाण्याचा विचार करत होते.

त्याचवेळी त्यांना काही जवळच्या मित्रांकडून मुद्रा बँक कर्जाविषयी माहिती मिळाली. त्यांनी सेंट्रल बँकेच्या शाखेशी संपर्क साधून कर्ज देण्याची विनंती केली. प्रमोद यांना बँकेकडून ८० हजार रूपये कर्ज म्हणून प्राप्त झाले.

या रकमेतून त्यांनी दुकानात झेरॉक्स मशिन व स्टेशनरी सामान खरेदी करून व्यवसाय सुरू केला. लवकरच, गावात दुसरे झेरॉक्स मशिन नसल्याने त्यांना दररोज ५०० ते ६०० रुपयांची कमाई सुरू झाली. त्यामुळे त्यांनी बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करून कर्ज पूर्ण भरले. त्यानंतर बँकेने त्यांना व्यवसायवाढ करण्यासाठी नव्याने रु. १ लाख ८० हजार मंजूर केले.

आपल्या भरभराटीसाठी प्रमोद कोलते यांनी सेंट्रल बँक व प्रधानमंत्री मुद्रा लोन योजना यांचे आभार मानले आहेत.

रेडीमेड कपडेविक्रीत सापडले उत्पन्नाचे साधन

नाव : संदीप अभाने

व्यवसाय : रेडीमेड कपड्यांची विक्री

श्री. संदीप कारभारी अभाने यांचा अकोला येथे कापडविक्रीचा व्यवसायआहे. ते वयाच्या २२ व्या वर्षांपासून हा व्यवसाय करतात. सायकलवरून शहरात फिरून ते कापडविक्रीचा व्यवसाय करायचे. यामधून त्यांना दिवसाकाठी २०० ते २५० रु. मिळायचे. व्यवसायवाढीसाठी त्यांना भांडवल हवे होते.

त्यांना प्रधानमंत्री मुद्रा योजनेची माहिती मिळाली. अभाने यांनी मुद्रा योजनेअंतर्गत व्यवसायवृद्धीसाठी ५० हजार रुपयांचा कर्जप्रस्ताव सादर केला.

या बँकेने मागील वर्षी अभाने यांना १४ सप्टेंबर २०१७ रोजी रु. ५० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले. या पैशातून त्यांनी व्यवसायासाठी अधिक माल खरेदी केला आहे. अकोला येथील न्यू क्लॉथ मार्केटमधून टॉवेल, लेडीज गारमेन्ट, रुमाल, मोजे यासारखे रेडीमेड कापड आता स्वत:च्या मालकीच्या दुचाकी वाहनावरून शहरातील विविध भागात फिरून रेडीमेड कापडमालाची विक्री ते करतात. दुचाकीमुळे कमी श्रमामध्ये ते आपल्या कापडाचा व्यवसाय चांगल्या प्रकारे करत आहेत. सणासुदीच्या दिवसात या उत्पन्नात चांगलीच भर पडते, असे त्यांनी सांगितले.

मुद्रा योजनेमध्ये कर्ज मिळाल्यामुळे उत्पन्नात भर पडली असून माझे दोन मुलांचे शिक्षण व्यवस्थितरीत्या होत आहे. आर्थिक उत्पन्न वाढले आहे. यामुळे मी समाधानी आहे, असे श्री. अभाने यांनी सांगितले.

दुचाकीमुळे कमी श्रमामध्ये ते आपल्या कापडाचा व्यवसाय चांगल्या प्रकारे करत आहेत. सणासुदीच्या दिवसात या उत्पन्नात चांगलीच भर पडते,असे त्यांनी सांगितले.

स्पा पार्लरने दिले आर्थिक स्वावलंबन

नाव : प्रचिती शेंडे

व्यवसाय : स्पा पार्लर

पार्लरमध्ये ग्राहकांना मिळणारी उच्च दर्जाची सेवा स्पाला वेगळी ओळख देत आहे. त्यांनी ४ मुलींना पार्लरचे प्रशिक्षण देऊन कामही दिले असून त्यांना प्रत्येकी ३ हजार रुपये पगार देतात.

सालोड हिरापूर येथील प्रचिती शेंडे व त्यांचे पती यांनी ब्युटी स्पाचे ६ महिन्यांचे प्रशिक्षण घेतले. कोर्स पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळताच त्यांनी स्पा पार्लर सुरू करण्यासाठी कर्ज प्रस्ताव तयार केला. मुद्रा योजनेबद्दल बँक व्यवस्थापकाशी चर्चा केल्यावर त्यांनी प्रोजेक्ट रिपोर्ट सादर केला. बँकेने एक महिन्याात १० लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. प्रचिती यांनी राहत्या घरी 'आराधना स्पा पार्लर' सुरू केले. मिळालेल्या कर्जातून पार्लरची आवश्यक सामग्री खरेदी केली. जवळच महाविद्यालय असल्याने त्यांना ग्राहकही मिळाले. पार्लरमध्ये ग्राहकांना मिळणारी सेवा उच्च दर्जाची असल्याने त्यांच्या स्पाची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्यांनी ४ मुलींना पार्लरचे प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून दिला. रोजचा १५ हजार रुपयांचा व्यवसाय होत असल्याचे त्यांनी सांगितले. तीन वर्षांत बँकेचे ५ लाख रुपये फेडले गेले. भविष्यात स्पा पार्लरचे प्रशिक्षण देणारी अकादमी सुरू करण्याचा मानस प्रचिती यांनी बोलताना व्यक्त केला. त्यांची ही आराधना मुद्राच्या सहकार्याने भरभराटीस येत आहे.

'घाम गाळून' पैसा कमविला...

नाव : अनुप गावंडे

व्यवसाय : जिम

अनुप विनायकराव गावंडे हा यवतमाळ येथील पदवीधर युवक. त्याला व्यवसाय करण्याची तीव्र इच्छा होती. केंद्र सरकारच्या मुद्रा बँक योजनेबद्दल माहिती मिळाल्यावर त्याने कर्जाच्या चौकशीकरता सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा यवतमाळ येथे संपर्क साधला. त्यावेळी त्याने बँकेला जिमचा व्यवसाय वाढविण्याकरीता मुद्रा बँक योजनेअंतर्गत कर्ज मिळण्यासाठी विनंती केली. बँकेच्या व्यवस्थापकांनी त्याची व्यवसाय करण्यासाठीची जिद्द व कठोर मेहनत घेण्याची तयारी पाहून त्याला रु. १० लाख इतकी रक्कम कर्ज म्हणून मंजूर केली. त्याचा वापर करत गावंडे याने जिमचा व्यवसाय सुरू केला असून आज त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

व्यवसाय यशस्वीरित्या सुरू असल्याने अनुपला कर्जाची परतफेड विहित वेळेत करणे शक्य होत आहे. हजारो लोकांना अर्थसाहाय्य करणाऱ्या मुद्रा योजनेप्रती त्याने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

बँकेच्या व्यवस्थापकांनी त्याला रु. १० लाख इतकी रक्कम कर्ज म्हणून मंजूर केली. त्याचा वापर करत गावंडे याने जिमचा व्यवसाय सुरू केला असून आज त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

मुद्रा अर्थसाहाय्यामुळे व्यवसायवृद्धी

नाव : प्रदीप आरु

व्यवसाय : झेरॉक्स, स्टेशनरी आणि जनरल स्टोअर्स

आज प्रदीप यांच्या श्री झेरॉक्स, स्टेशनरी आणि जनरल स्टोअर्सची एकूण गुंतवणूक १४ लाख रुपये असून मासिक उत्पन्न ७० ते ८० हजार पर्यंत आहे.

तरुणांनी रोजगार मिळवण्यापेक्षा रोजगारनिर्मिती करून स्वाभिमानाने जगावे याकरिता सुरू करण्यात आलेल्या मुद्रा योजनेमुळे बेरोजगारांचे व्यवसायाचे स्वप्न साकार होताना दिसत आहे. असेच एक छोटे उद्योजक आज मोठ्या उद्योजकतेकडे वाटचाल करताना दिसत आहेत. प्रदीप आरु यांनी वाशिम शहरामध्ये आपला छोटा व्यवसाय सुरू केला. कोणत्याही सहकार्याविना सुरू केलेला व्यवसाय वाढवताना अनंत अडचणी येत होत्या. परंतु प्रधानमंत्री मुद्रा योजनेची माहिती मिळताच त्यांनी वाशिम येथील बँक ऑफ महाराष्ट्र च्या व्यवस्थापकांची भेट घेतली व त्यांना त्यांच्या व्यवसाय वाढीची संकल्पना स्पष्ट करून दाखविली. व्यवस्थापक साहेबांनी सुद्धा बँकेचे कर्ज देणे आणि उद्योजक घडविणे या उद्देशाची पूर्ती म्हणून प्रदीप यांना तातडीने मुद्रा अंतर्गत ४ लाख रुपयाचे कर्ज मंजूर केले. आज प्रदीप यांच्या श्री झेरॉक्स, स्टेशनरी आणि जनरल स्टोअर्स ची एकूण गुंतवणूक १४ लाख रुपये असून मासिक उत्पन्न ७० ते ८० हजार पर्यंत आहे. ते आजही बँक व्यवस्थापक आणि मुद्रा योजनेचे आभारी आहेत व नियमित कर्जफेड करत आहेत.

ग्राहकांसाठी सरकार सेवा केंद्र

नाव : सुजाता गबने

व्यवसाय : शासकीय सेवासुविधा पुरविणे

शिक्षण घेत असतानाच सुजाता हिने व्यवसाय करायचे ठरवले होते. आधार कार्ड, पॅन कार्ड, आरटीओ, ऑनलाईन सर्व्हिसेस या सुविधा लोकांना उपलब्ध करून देण्याचे तिच्या मनात होते. यासाठी कर्ज घेण्यासाठी म्हणून बँक ऑफ बडोदा, मनीषनगर शाखा येथील ब्रँच मॅनेजरशी तिने चर्चा केली व मुद्रा लोन बद्दल माहिती मिळवली. अल्पावधीतच तिला २ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले.

यातून तिने आपले सरकार सेवा केंद्र सुरू केले. तसेच त्यातून तिने दुकानाचा विस्तार करून फर्निचरची तसेच कॉम्प्युटर, प्रिंटर आदी सामग्रीची खरेदी केली.

आज तिचा आधार कार्ड, पॅन कार्ड, आरटीओ, ऑनलाईन सर्व्हिसेस तसेच शासकीय सेवा यांचा व्यवसाय तेजीत असून ५ लोकांना तिने रोजगार उपलब्ध करून दिला आहे. बँकेचे कर्जाचे हप्ते फेडूनही तिच्याकडे आता शिलकीत रक्कम राहत आहे.

मुद्रा योजनेबद्दल ती समाधानी आहे. या योजनेमुळे आपला सामाजिक व आर्थिक स्तर वाढला आहे असे तिला वाटते.

आज तिचा आधार कार्ड, पॅन कार्ड, आरटीओ, ऑनलाईन सर्व्हिसेस तसेच शासकीय सेवा यांचा व्यवसाय तेजीत असून ५ लोकांना तिने रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

आणि पार्लरचे स्वप्न फळाला आले...

नाव : अनंत वाळूकर

व्यवसाय : हेअर ड्रेसिंग व ब्युटी ट्रीटमेंट सलून

बँकेने त्यांना ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. या कर्जाच्या रकमेतून त्यांनी त्यांच्या सलूनसाठी आधुनिक मशिनरी घेतली व पायाभूत सुविधांचीही सोय केली.

भंडारा येथील नवउद्योजक अनंत वाळूकर ह्यांनी २०१७ मध्ये हेअर ड्रेसिंग व इतर ब्युटी ट्रीटमेंट्स यांची सेवा देणारा सलूनचा व्यवसाय सुरू केला. हळूहळू या व्यवसायातून त्यांना नियमित उत्पन्न मिळू लागले. मग व्यवसायाचा विस्तार करण्याची स्वप्ने खुणावू लागली. मात्र त्यासाठी त्यांना निधीची कमतरता भेडसावत होती.

यादरम्यान त्यांना भारत सरकारच्या मुद्रा योजनेबद्दल समजले. त्यावर त्यांनी सिंडीकेट बँकेत कर्जासाठी प्रस्ताव दिला. बँकेने त्यांना ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. या कर्जाच्या रकमेतून त्यांनी त्यांच्या सलूनसाठी आधुनिक मशिनरी घेतली व पायाभूत सुविधांचीही सोय केली. या व्यवसायाच्या आधारे अनंत यांनी अजून ४ लोकांना रोजगार मिळवून दिला आहे. आज त्यांचा हा व्यवसाय चांगल्या रितीने सुरू असून त्यांचे उत्पन्न महिन्याला ५० हजारापर्यंत आहे.

मुद्रा योजनेनेच हे शक्य झाले असे ते मानतात.

मुद्रामुळे शिलाई व्यवसायाचा विस्तार

नाव : साधना पाटील

व्यवसाय : शिलाई मशिनधारक

चंद्रपूर येथील साधना रमेश पाटील यांचे यजमान रिक्षा चालवतात. त्या स्वत:ही आजूबाजूच्या परिसरातील महिलांची साडीला फॉल, पिको, ब्लाऊज शिवणे ही कामे करत असत. बचतगटांच्या माध्यमातून अनेक कामे सुरू होती. मुलाचे लग्न झाल्यावर प्रापंचिक जबाबदारी कमी झाल्यावर त्यांना आपल्या व्यवसायाचा विस्तार करावा आणि घरखर्चाला हातभार लावावा असे वाटू लागले. इतर महिलांकडून त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर ड्रेसेस शिवण्यासाठी ड्रेस मटेरिअल येत होते. त्यामुळे सुनेच्या मदतीने व्यवसायवृद्धी करण्याचे त्यांनी ठरवले. मात्र यासाठी अजून एका शिलाई मशिनची आवश्यकता होती.

त्याच वेळी त्यांना मुद्रा लोनबद्दल बचत गटाच्या माध्यमातून माहिती मिळाली आणि त्यांनी बँकेकडे त्याबद्दल चौकशी केली. त्यांना बँकेने ५० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले.

कर्ज मिळाल्यावर त्यांनी आपल्या आधीच्या व्यवसायाचा अजून विस्तार केला आहे. कर्जाची त्या नियमितपणे परतफेड करत असून लोन मिळाल्यामुळे पतीप्रमाणेच त्यादेखील घर चालवण्यास हातभार लावत आहेत. त्यासाठी घरातील सर्व सदस्यांची, विशेषत: सुनेची मदत मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त करून, 'मुद्रा बँक योजनेमुळे शिलाईकामाच्या व्यवसायाचा विस्तार करता आला आणि व्यवसायवृद्धीचे स्वप्न पूर्ण झाले' अशी त्यांची भावना आहे.

इतर महिलांकडून त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर ड्रेसेस शिवण्यासाठी ड्रेस मटेरिअल येत होते. त्यामुळे सुनेच्या मदतीने व्यवसायवृद्धी करण्याचे त्यांनी ठरवले.

मुद्रामुळे शक्य झाला व्यवसायाचा विस्तार

नाव : भुवन शाखरे

व्यवसाय : एशियन पेन्ट्सची डीलरशिप

कर्जप्राप्तीतून भुवन यांनी त्यांच्या व्यवसायाचा विस्तार केला. या व्यवसायामुळे त्यांची परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. त्यांचे दुकान आता उत्तम प्रकारे चालत असून उत्पन्नातदेखील वाढ होत आहे.

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथील हे श्री. भुवन शाखरे हे मुद्रा योजनेचे लाभार्थी आहेत.

भुवन यांना पेंट्सच्या विक्रीच्या कामातील पूर्वानुभव असल्याने ते पेंट्सची छोट्या प्रमाणावर विक्री करत. त्यातून भरपूर अनुभव गोळा झाल्याने त्यातून स्वतःचा अशाच प्रकारचा व्यवसाय त्यांनी सुरू केला होता. परंतु तेवढ्यावरच न थांबता हा सुरू केलेला व्यवसाय त्यांना वाढवायचा देखील होता. भुवन यांना एशियन पेंट्सची डीलरशिप मिळाली होती, पण व्यवसाय वाढीसाठी त्यांना निधीची कमतरता भेडसावत होती. त्यामुळे व्यवसायाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी बँक ऑफ इंडियाच्या आमगाव शाखेकडे कर्जासाठी प्रस्ताव सादर केला. परंतु या दरम्यान त्यांना भारत सरकारच्या मुद्रा योजनेबद्दल समजले. या योजनेद्वारेच बँकेने त्यांना ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. या कर्जप्राप्तीतून त्यांनी त्यांच्या व्यवसायाचा विस्तार केला. या व्यवसायामुळे त्यांची परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. त्यांचे पेंट्सचे दुकान आता उत्तम प्रकारे चालत असून उत्पन्नातदेखील वाढ होत आहे.

मुद्राचे साहाय्य मिळाले, भविष्य बदलले



नाव : सुनिल कुंभारे

व्यवसाय : संगणक विक्री व दुरुस्तीचे दुकान

गडचिरोली मधील बार्डी येथील सुनील कुंभारे यांचे 'कमल कॉम्प्युटर' या नावाने संगणकविक्री व दुरुस्तीचे दुकान आहे. संगणक दुरुस्तीसाठी विशिष्ट टूल्स व इतर सामानाची आवश्यकता असते. हे सामान सुनीलकडे नव्हते. यामुळे व्यवसाय करत असताना अपेक्षित ठिकाणी सेवा पुरवण्यासारख्या कामात त्यांना अडचणी येत असत. भांडवलाअभावी सुनील त्यांच्या दुकानात आवश्यक ती सामग्री खरेदी करू शकत नव्हते. दरम्यान, त्यांना प्रधानमंत्री मुद्रा योजनेबाबत माहिती मिळाली. आपल्या व्यवसायासाठी या योजनेतून निश्चित लाभ होऊ शकतो, असे त्यांना वाटू लागले.

सुनील यांनी बँकेत मुद्राबद्दल चौकशी केली असता बँकेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना विस्तृतपणे सर्व माहिती दिली. त्यातून आपला अंदाज खरा ठरेल असे सुनील यांना मनोमन वाटू लागले. सुनील यांनी लवकरच बँकेशी संपर्क साधत कर्जासाठी अर्ज केला व बँकेने त्यांना ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. या कर्जामुळे त्यांची परिस्थिती सुधारली असून ते दुकानात कॉम्प्युटरशी संबंधित गोष्टी ठेवून ग्राहकांना त्याचा जरुरीनुसार पुरवठा करत आहेत. आता आपल्या व्यवसायाचा दर्जा सुधारला आहे व त्यामुळे काम करताना अधिक समधान लाभत आहे, असे त्यांना वाटते. यासाठी मुद्रा योजना व केंद्र सरकारचे त्यांनी आभार मानले आहेत.

बँकेने सुनील यांना ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. या कर्जामुळे त्यांची परिस्थिती सुधारली असून ते दुकानात कॉम्प्युटरशी संबंधित गोष्टी ठेवून ग्राहकांना त्याचा जरुरीनुसार पुरवठा करत आहेत.

गारमेंट मेकिंग प्रशिक्षणातून भविष्य घडवले

नाव : स्वाती मेस्त्री

व्यवसाय : गारमेंट मेकिंग

मुद्रा अंतर्गत कर्ज घेऊन स्वाती शासनाच्या प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत गारमेंट मेकिंगचे प्रशिक्षण देत आहे, याचा तिला मनापासून आनंद होत आहे.

स्वाती मेस्त्री ही कासा गावात २५ वर्षांपासून राहत असून तिने १२ वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर दादर येथे फॅशन डिझाईनिंगचा डिप्लोमा केला. पुढे तिने ५५०० रुपये पगारावर वर्षभर नोकरी करून अनुभव घेतला. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने तिला नोकरी करणे अपरिहार्य होते. कुटुंबाच्या पाठिंब्यावर तिने सगळ्या अडचणींना धैर्याने तोंड दिले. यादरम्यान तिची डी.आय.सी. चे श्री संजय ठाकूर यांच्याशी ओळख झाली. त्यांनी सीड मनीबद्दल तिला माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे बँक ऑफ महाराष्ट्रच्या कासा ब्रँचला भेट दिली असता तिला मुद्रा योजनेबद्दल माहिती समजली. बँकेने मुद्राअंतर्गत साडेसात लाख व सीड मनीअंतर्गत दीड लाख कर्ज मंजूर झाले. त्यावेळी कलेक्टर ऑफिस, पालघर येथे कौशल्य विकास मार्गदर्शक अधिकारी श्री. मुकेश संखे यांच्याशी ओळख झाली. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली मार्च २०१७ साली प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाअंतर्गत 'स्वानंद एंटरप्राइझ' या नावाने गारमेंट मेकिंगचे प्रशिक्षण केंद्र सुरू केले.

मुद्रा अंतर्गत कर्ज घेऊन स्वाती शासनाच्याच प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अंतर्गत गारमेंट मेकिंगचे प्रशिक्षण देत आहे, याचा तिला मनापासून आनंद होत आहे, असे तिने सांगितले. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास योजनेअंतर्गत तिला २०१७ मध्ये पालघर जिल्ह्यातील तृतीय क्रमांकाचा व २०१८ मध्ये द्वितीय सर्वोत्कृष्ट व्हीटीपी पुरस्कार मिळाला.

मुद्राच्या मदतीने अन्न प्रक्रिया व्यवसाय

नाव : कुलदीप वर्तक

व्यवसाय : अन्न प्रक्रिया व्यवसाय

पालघर जिल्ह्यातील केळवे या गावी राहणारे कुलदीप वर्तक यांनी हॉटेल मॅनेजमेंटचा डिप्लोमा केला असून दोन वर्षे परदेशात नोकरी केली. परंतु व्यवसाय सुरू करण्याच्या इच्छेने त्यांनी नोकरी सोडून दिली व ते केळवे येथे परत आले. गावी परतल्यानंतर त्यांनी अनेकविध व्यवसाय केले. पण त्यांचा कल अन्न प्रक्रिया व्यवसायाकडे असल्याने कुलदीप इतर व्यवसायात रमले नाहीत. त्यांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर येथे भेट दिली असता कौशल्य विकास मार्गदर्शक अधिकारी श्री. मुकेश संखे यांनी मुद्रा योजनेबद्दल कुलदीप यांना सांगितले. त्यानंतर कुलदीप यांनी पुण्याला अन्न प्रक्रिया व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर अन्न प्रक्रिया व्यवसाय सुरू करण्याचा त्यांच्या निश्चय झाला व कर्जासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रास भेट देऊन बँक ऑफ बडोदाच्या पालघर शाखेकडे कर्जप्रस्ताव सादर केला. मा. जिल्हाधिकारी व बँकेचे कर्मचारी यांच्या मदतीने कुलदीप यांचे कर्ज २५-९-१८ रोजी मंजूर झाले आहे.

इतर बेरोजगार तरुणांनीही या योजनेचा लाभ घ्यावा व स्वत:साठी रोजगार निर्माण करावेत असे कुलदीप म्हणतात. कुलदीप यांनी घेतलेल्या कर्जाचा व्याज परतावा त्यांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वैयक्तिक व्याज परतावा योजनेतून मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलदीप यांनी पुण्याला अन्न प्रक्रिया व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर अन्न प्रक्रिया व्यवसाय सुरू करण्याचा त्यांच्या निश्चय झाला.

मार्गदर्शनातून अर्थार्जन

नाव : वसंत देशपांडे

व्यवसाय : कौशल्य विकास केंद्र

प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या या प्रशिक्षण केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना मुद्रा लोन योजनेअंतर्गत आय.डी.बी. आय बँकेकडून ३ लाखांचे कर्ज मंजूर झाले.

वर्धा येथील वसंत देशपांडे यांनी शिक्षण विभागातून निवृत्त झाल्यावर स्वामी समर्थ कन्सल्टन्सी या नावाने कौशल्य विकास केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात ते नवउद्योजकांना मेडिकल व नर्सिंग, रीटेल, बँकिंग अशा विविध क्षेत्रातील प्रशिक्षण देत आहेत. प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या या प्रशिक्षण केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना मुद्रा लोन योजनेअंतर्गत आय. डी.बी.आय बँकेकडून ३ लाखांचे कर्ज मंजूर झाले. मुद्रा लोन मंजूर झाल्यानंतर त्यांनी ६९० उमेदवारांना प्रशिक्षित केले असून त्यांपैकी ४४६ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. १७० उमेदवारांना रोजगार मिळवून दिला आहे. पी.एम. के.यु.व्ही.ए. व एन.यु.एल.एम. च्या नियमांनुसार ३५७ पैकी १७० प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंरोजगार व रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

टॅक्सी चालवून उपजीविका

नाव : पूनम राऊत

व्यवसाय : टॅक्सी चालवणे

पूनम राऊत ह्या पालघर जिल्ह्यातील केळवे नारतळे ह्या गावच्या एक सामान्य गृहिणी आहेत. स्वत: काहीतरी व्यवसाय करून घराला हातभार लावावा असे त्यांना वाटत होते. त्यांचे पती प्रचोदय राऊत हे टॅक्सी चालवत होते. त्यामुळे पूनम ह्यांनीही या व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतला. टॅक्सी खरेदीसाठी त्यांना भांडवलाची गरज पडणार होती. घरच्या नाजूक आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी कर्ज घेण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर येथे भेट दिली असता त्यांना कौशल्य विकास मार्गदर्शक अधिकारी श्री. मुकेश संखे यांनी मुद्रा योजनेबद्दल माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पालघरमधील बँक ऑफ बडोदा येथे मुद्रा योजनेअंतर्गत कर्जासाठी प्रस्ताव सादर केला. त्यांच्या कर्जास मंजुरी मिळाल्यावर स्वत:ची टॅक्सी खरेदी करून त्या पालघर शहरात व्यवसाय करत आहेत.

मुद्रा कर्ज योजनेचा त्यांच्या कुटुंबाला खूप फायदा झाला आहे. त्यांचे व्यवसाय करण्याचे स्वप्न साकार झाले आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''मी सर्वांना एकच गोष्ट सांगू इच्छिते की इतर बेरोजगार युवक युवतींनी या योजनेचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू करावा.'' त्यांनी घेतलेल्या कर्जाचा व्याज परतावा त्यांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वैयक्तिक व्याज परतावा योजनेतून मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मी सर्वांना एकच गोष्ट सांगू इच्छिते की इतर बेरोजगार युवक युवतींनी या योजनेचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू करावा.

कौशल्य विकासाचा ध्यास

नाव : सागर धर्माधिकारी

व्यवसाय : कौशल्य विकास केंद्र

या योजनेचा लाभ घेऊन त्यांनी आपल्या संस्थेची ८ केंद्रे स्थापली असून नवीन ५२ स्थापन करण्याचा त्यांचा मानस आहे.

नाशिक येथील सागर धर्माधिकारी यांनी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त होऊन स्किल इंडिया मिशनमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला व इझी सोल्युशन ॲकॅडमी सुरू केली. त्यांना खूप आधीपासूनच युवाशक्तीच्या मजबूतीकरणाची जबरदस्त इच्छा होती. त्यामुळे कौशल्य विकास अभियानाअंतर्गत एम.एस.एस.डी. एस चे प्रशिक्षण केंद्र सुरू केले. सागर यांनी नाशिक येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेशी संपर्क साधला. बँकेच्या लोकांनी या प्रकरणी त्यांना मोलाची मदत केली. सागर यांचे वाढते व्यवहार बघून बँकेने मुद्राची मर्यादा वाढवून ३.५० लक्ष केली. फेब्रुवारीपासून आजपर्यंत त्यांनी बँकेचे व्याज नियमितपणे भरले आहे. या योजनेचा लाभ घेऊन त्यांनी आपल्या संस्थेची ८ केंद्रे स्थापली असून नवीन ५२ स्थापन करण्याचा त्यांचा मानस आहे. आज सागर फक्त प्रशिक्षण देऊनच थांबले नाहीत, तर त्यांचे प्रशिक्षणार्थी उमेदवारांना बँकिंग, टुरीझम व अन्य क्षेत्रात रोजगार मिळवत असून स्वत:च्या जीवनाची यशस्वी वाटचाल करत आहेत. सागर यांच्या संस्थेचे महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, कंपन्यांबरोबर सामंजस्य करार झाले आहेत. त्याद्वारे ते विद्यार्थ्यांना उच्च संधी देण्याचा प्रयत्न करत असतात. मुद्रा योजनेबद्दल सागर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

'मुद्रा' संबंधित प्रश्नोत्तरे

१. 'मुद्रा' म्हणजे काय?

मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लि. ('मुद्रा'), भारत सरकारद्वारे स्थापित एक वित्तीय संस्था आहे, जी सूक्ष्म उद्योगांना वित्त पुरवठा करण्यासाठी कार्य करणाऱ्या वित्तीय संस्थांना पुनर्वित्त उपलब्ध करून देते. मा. वित्तमंत्र्यांनी २०१६ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना या योजनेची घोषणा केली. 'मुद्रा'चा उद्देश बँका, Non Banking Finance Companies (NBFC) आणि Micro Finance Institution (MFI) सारख्या विविध संस्थांद्वारे नॉन-कॉर्पोरेट लघु उद्योग क्षेत्राला निधी पुरवणे हा आहे.

२. 'मुद्रा'ची स्थापना का केली गेली आहे?

नॉन कॉर्पोरेट लघु क्षेत्रातील व्यवसायासाठी पुरेसा वित्त पुरवठा उपलब्ध नसणे, ही एक मोठी अडचण आहे. ९०% पेक्षाही अधिक उद्योग क्षेत्रातील व्यवसायांसाठी पुरेसा वित्त पुरवठा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. नॉन कॉर्पोरेट क्षेत्रासाठी पुरेसा वित्तीय पुरवठा उपलब्ध करून या क्षेत्राला मुख्य प्रवाहात आणण्याच्या उदात्त हेतूने केंद्र शासनाने 'मुद्रा'ची स्थापना केली आहे. यासाठी केंद्र शासनाने प्रलंबित 'मुद्रा' बँक कायदा मंजूर करून Small Industries Development Bank of India (SIDBI) च्या अंतर्गत नॉन बँकिंग वित्तीय कंपनी 'मुद्रा लिमिटेड'ची स्थापना करण्यात आली आहे.

३. मुद्राची भूमिका व जबाबदाऱ्या काय आहेत?

सूक्ष्म/लघु क्षेत्रातील उत्पादन करणाऱ्या, व्यापार करणाऱ्या व सेवा क्षेत्रातील व्यवसायासाठी वित्त पुरवठा करीत असलेल्या सर्व नॉन बँकिंग, वित्तीय संस्था, सेक्शन अंतर्गत नोंदणीकृत व्यापारी संस्था, अनुसूचित ग्रामीण बँका यांना पुनर्वित्त देण्यासाठी बांधील आहे. याच बरोबर राज्यस्तरीय/ विभागीय स्तरावरील वित्तीय संस्थांकडून लघु उद्योगांना वित्त पुरवठा होण्यासाठी भागीदारी करेल.

४. 'मुद्रा' अंतर्गत उपलब्ध योजना कोणत्या आहेत? 'मुद्रा' कसे कार्य करते?

प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत शिशु, किशोर व तरुण या तीन गट प्रकारामध्ये कर्ज सुविधा उपलब्ध आहे. लघु उद्योगाची कर्जाची निकड व टप्याटप्याने उद्योगाच्या वाढीनुरूप व गरजेनुरूप आवश्यक कर्जपुरवठा बँकांकडून उपलब्ध करण्याच्या दृष्टीने वरीलप्रमाणे कर्जाचे ३ गटप्रकार केले आहेत. अ) शिशु

नॉन कॉर्पोरेट क्षेत्रासाठी पुरेसा वित्तीय पुरवठा उपलब्ध करून या क्षेत्राला मुख्य प्रवाहात आणण्याच्या उदात्त हेतूने केंद्र शासनाने मुद्रा योजनेची स्थापना केली आहे.

गटांतर्गत रु.५०,०००/- च्या मर्यादेत, ब) किशोर गटांतर्गत रु.५०,०००/- च्या पुढील व रु.५ लाखाच्या खालील कर्ज, क) तरुण गटांतर्गत रु.५ लाखावरील परंतु रु.१० लाखाच्या मर्यादेत कर्जाची सुविधा विविध बँका व वित्तीय संस्थांकडून उपलब्ध केली आहे.

५. मुद्रा अंतर्गत लाभार्थी कोण? मुद्रा अंतर्गत कोणत्या प्रकारचे लाभार्थी साहाय्यासाठी पात्र आहेत?

नॉन कॉर्पोरेट लघुउद्योग क्षेत्रातील प्रोप्रायटर, भागीदारी फर्म, ज्यामध्ये उत्पादित युनिट्स, सेवा क्षेत्रातील युनिट्स, ट्रक ऑपरेटर, अन्न सेवा युनिट, दुरुस्ती दुकाने, मशीन ऑपरेटर, कारागीर, खाद्य प्रक्रिया उद्योग आणि इतर ग्रामीण व शहरी क्षेत्रातील लघुउद्योग हे मुद्राचे लाभार्थी आहेत.

६. प्रादेशिक ग्रामीण बँका या मुद्राअंतर्गत साहाय्यासाठी पात्र आहेत काय?

होय, मुद्रा विभागीय ग्रामीण बँकांना पुनर्वित्त साहाय्य उपलब्ध करून देते.

७. मुद्रा अंतर्गत व्याजाचा दर काय निश्चित केला आहे?

मुद्रा ही बँका व वित्तीय संस्था यांना पुनर्वित्त उपलब्ध करून देणारी एक संस्था आहे. मुद्रा ही लघुउद्योगासाठी वित्त पुरवठा करणाऱ्या प्रत्येक व शेवटातील शेवटच्या वित्तीय संस्थेस या योजनेंतर्गत पुनर्वित्त उपलब्ध करून देईल. व्याज दरात तर्कसंगत बदल करण्यासाठी प्रयत्न करून कर्जदारांसाठी प्रक्रिया शुल्क कमी करण्यासाठी योग्य तंत्रज्ञानासह अर्थपूर्ण अर्थ निर्देशांचा वापर केला जाईल.

प्रादेशिक ग्रामीण बँका या मुद्राअंतर्गत साहाय्यासाठी पात्र आहेत. मुद्रा विभागीय ग्रामीण बँकांना पुनर्वित्त साहाय्य उपलब्ध करून देते.

८. प्रधानमंत्री मुद्रा योजनेची व्याप्ती काय आहे? आणि कोणकोणत्या प्रकारची कर्ज यामध्ये उपलबध असून कोणत्या संस्थेकडून कर्ज मिळू शकेल?

प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका, सहकारी बँका, खासगी क्षेत्रातील बँका, विदेशी बँका, मायक्रो फायनान्स संस्था आणि नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांसारख्या सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे/ वित्तीय संस्थाद्वारे उघु उद्योजकांना कर्ज देण्याची सुविधा आहे. उत्पन्न निर्मितीसाठी बँका/ वित्तीय संस्था यांचेकडून ८ एप्रिल, २०१५ नंतर देण्यात येणारी रु.१० लाखाखालील सर्व कर्ज ही प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील कर्ज समजण्यात येतील.

९. मुद्रामार्फत कुठल्या योजना उपलब्ध करून दिल्या जातील?

मुद्रा योजनेत खालील तीन श्रेणींचा समावेश आहे:

शिशु : शिशु श्रेणीअंतर्गत रु. ५०,००० चे कर्ज मिळू शकते.

किशोर : किशोर श्रेणीत रु. ५०,००० पासून रु. ५ लाखांपर्यंत कर्ज दिले जाते.

तरुण श्रेणी : तरुण श्रेणीअंतर्गत रु. ५ लाखांपासून रु. १० लाखांपर्यंत कर्ज मिळेल.

१०. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे संनियंत्रण कोण करते?

राज्यस्तरावर प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे संनियंत्रण राज्यस्तरीय बँकर्स समितीकडून केले जाईल. त्याचप्रमाणे देशपातळीवर या योजनेचे संनियंत्रण वित्तीय सेवा विभाग/ मुद्रा कार्यालय, भारत सरकार यांचेकडून करण्यात येते. यासाठी केंद्र शासनाने मुद्राचे संकेतस्थळ विकसित करून कार्यान्वित केले आहे. यामध्ये योजनेशी संबंधित बँका/ इतर कर्ज पुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्था यांचेकडून माहिती नियमितपणे भरली जाते.

११. केंद्र व राज्यशासनाची अशी कोणती योजना आहे, ज्यामध्ये जामिनाशिवाय कर्ज दिले जाते?

केंद्र शासनाची प्रधानमंत्री मुद्रा योजना ही एक अशी योजना आहे ज्यामध्ये लघु उद्योजकांना बँका वा इतर वित्तीय संस्थांकडून विनातारण रु. १० लाखांपर्यंतचे कर्ज दिले जाते.

१२. मुद्रा अंतर्गत कर्ज मिळण्यासाठी व्यक्तींची पात्रता निकष काय आहेत?

भारतीय नागरिक ज्याच्याकडे बिगर शेतकरी उत्पन्न निर्माण करण्याच्या व्यवसायाची योजना आहे जसे की, उत्पादन/ प्रक्रिया/ व्यापार किंवा सेवा क्षेत्रातील कोणताही उद्योग व्यवसाय ज्यासाठी रु.१० लाखापर्यंत कर्ज रकमेची गरज आहे, अशी व्यक्ती मुद्रा अंतर्गत कर्जासाठी पात्र आहे. प्रधानमंत्री मुद्रा अंतर्गत कर्ज घेण्यासाठी कर्ज देणारी बँका/ वित्तीय संस्थेच्या सर्वसाधारण अटी आणि नियमांचा अवलंब करावा लागेल. मुद्रा अंतर्गत कर्जाचे व्याजदर हे भारतीय रिझर्व बँकेच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार लागू आहेत.

१३. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत अनुदान मिळते काय? तसे असल्यास त्याचा तपशील?

प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत अनुदान लागू नाही. तथापि, जर कर्ज प्रस्तावाची काही सरकारी योजनांशी निगडीत असल्यास व त्यामध्ये शासकीय भांडवल अनुदान मिळाल्यास ते प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत देखील पात्र असेल.

१४. तुम्ही मुद्रा कार्डबाबत माहिती देऊ शकता का?

मुद्रा कार्ड हे एक नाविन्यपूर्ण क्रेडिट कार्ड आहे. ज्यामध्ये कर्जदार कोणत्याही

केंद्र शासनाने मुद्राचे संकेतस्थळ विकसित करून कार्यान्वित केले आहे, ज्यामध्ये योजनेशी संबंधित बँका, कर्ज पुरवठा करणाऱ्या इतर वित्तीय संस्था यांचेकडून नियमितपणे अद्ययावत माहिती भरली जाते.

अडथळ्याविना मुक्त आणि लवचिक पद्धतीने कर्जाचा लाभ घेऊ शकतो. मुद्रा कार्ड व्यावसायिकास सी.सी. (Cash Credit)/ ओव्हरड्राफ्टच्या स्वरूपात खेळते भांडवलासाठी उपयोगात येते. मुद्रा कार्ड हे रुपे डेबिट कार्ड असल्याने एटीएममधून रोख रक्कम काढण्यासाठी किंवा विक्री पॉईंट (पीएसओ) मशीन वापरून खरेदी करण्यासाठी हे कार्ड वापरता येते. अतिरिक्त रोख रक्कम उपलब्ध असताना आणि नंतर व्याज दर कमी करून रक्कम परत देण्याची सुविधा देखील आहे.

१५. मुद्रा अंतर्गत कर्ज मिळण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे?

मुद्रा अंतर्गत कर्ज मिळण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकांसाठी लागू असलेल्या प्रचलित अटी व शर्ती त्याचप्रमाणे मार्गदर्शक सूचना लागू आहेत. आवश्यक कागदपत्रांविषयीचे मार्गदर्शन आपल्या परिसरातील कोणत्याही बँक/ वित्तीय संस्थेमधून आपणांस मिळू शकेल.

१६. मुद्रा कर्जासाठी सुरक्षा रक्कम जमा ठेवावी लागते का? याबाबत विस्तृतपणे सांगाल काय?

लघु उद्योग क्षेत्रातील व्यवस्था यासाठी रु. १० लाखापर्यंतच्या कर्जाबाबत कोणतीही अनुषंगिक तारण न घेण्याबाबत भारतीय रिझर्व बँकेने स्थापन केलेल्या वर्किंग ग्रुपच्या शिफारशीनुसार सर्व बँकांना बंधनकारक केले आहे.

१७. मुद्रा कर्जासाठी मानक स्वरूपातील (Standard Format) **अर्जाचा नमुना आहे का?**

होय. शिशु गटप्रकारातील कर्जासाठी एक पृष्ठाचे अर्ज तयार केले आहे, जे मुद्रा पोर्टलवर उपलब्ध आहे. किशोर व तरुण गट प्रकारातील कर्जासाठी तीन पृष्ठाचे अर्ज तयार केले असून ते देखील मुद्रा पोर्टलवर उपलब्ध आहे.

१८. मुद्रा अंतर्गत कर्जासाठी लागू असलेल्या परतफेडीच्या अटी, पात्रता आणि कृती आराखडा याबाबत आपण थोडक्यात स्पष्ट करू शकता काय?

कर्जाच्या अटी व शर्ती या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या व्यापक मार्गदर्शक तत्त्वांनुसार कर्ज देणाऱ्या बँकेच्या/ वित्तीय संस्थेच्या नियमास अधीन राहून असतील. कर्ज प्रस्तावाच्या केवळ गुणवत्तेनुसार बँक/ वित्तीय संस्था कर्ज विनंती अर्जावर प्रक्रिया करेल. प्रस्तावित लघु व्यवसायातील उत्पन्न निर्मितीच्या अंदाज पत्रकानुसारच आवश्यक असलेला कर्जाची रक्कम बँक निश्चित करेल. व्यवसायाच्या उत्पन्नानुसार म्हणजेच रोख प्रवाहानुसार (Cash Flow) परतफेडीचा कालावधी व परतफेडीचा हप्ता निश्चित केला जाईल.

मुद्रा कार्ड हे रुपे डेबिट कार्ड असल्याने एटीएममधून रोख रक्कम काढण्यासाठी किंवा विक्री पॉईंट (पीएसओ) मशीन वापरून खरेदी करण्यासाठी हे कार्ड वापरता येते.

तसेच कर्जदाराची कर्जासाठी पात्रता ही कर्ज देणाऱ्या संस्थेच्या नियमानुसार ठरविली जाईल.

१९. प्रधान मंत्री मुद्रा योजना भारतातील सर्व बँकांसाठी लागू आहे काय?

होय, वित्तीय सेवा विभाग, भारत सरकार यांचे पत्र दि.१४ मे,२०१५ नुसार सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि अनुसूचित सहकारी बँका यांना दिनांक ०८ एप्रिल, २०१८ नंतर रु. १० लाखाखालील सर्व मंजूर होणारी लघुव्यवसाय क्षेत्रातील व्यवसायासाठीची कर्जे ही प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील समजूनच मंजूर करावीत, असे निर्देश दिले आहेत.

२०. मुद्रा कर्जासाठी जीवन विमा असण्याची गरज आहे काय?

जीवन विमा प्रधानमंत्री मुद्रा योजनेसाठी आवश्यक नाही.

२१. प्रधानमंत्री मुद्रा योजनेसाठी पॅन कार्ड असणे सक्तीचे आहे काय?

प्रधानमंत्री मुद्रा योजनेसाठी पॅन कार्ड असणे अनिवार्य नाही. तथापि, कर्जदाराने बँकेच्या नियमानुसार KYC करून घेणे आवश्यक आहे.

२२. मुद्रा कर्जासाठी व्याजाचे दर काय आहे?

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वाजवी व्याजदर आकारण्याचा सल्ला सर्व बँकांना दिला आहे.

२३. बँकाकडून प्रधानमंत्री मुद्रा योजनेतंर्गत कर्ज मंजुरीवेळी सुरक्षित ठेव रक्कम किंवा अनुषंगिक तारण ठेवसाठी आग्रह केला जातो त्या विरोधात काय कारवाई केली जाऊ शकते, कारण बऱ्याच ठिकाणी बँका या सूरक्षा ठेव रक्कमेसाठी किंवा अनुषंगिक तारण ठेवण्यासाठी आग्रही आहेत. अशा परिस्थितील बँकेच्या विरोधात तक्रार करावयाची झाल्यास ती कोठे केली जाऊ शकते?

कोणत्याही बँक शाखेच्या विरोधात या प्रकरणी आपण संबंधित बँकेचे प्रादेशिक कार्यालय/ विभागीय कार्यालय/ मुख्यालयामकडे तक्रार नोंदवू शकता. प्रत्येक बँकेच्या तक्रार निवारण पद्धतीचा तपशील बँकेच्या प्रत्येक शाखेमध्ये उपलब्ध केला जाईल.

२४. मुद्रा अंतर्गत कर्जासाठी अपंग व्यक्ती पात्र आहेत काय?

सर्व भारतीय नागरिक जे कर्ज घेण्यास पात्र आहेत आणि त्यांचा व्यवसाय उत्पन्न निर्मितीची खात्री देत आहे, अशा व्यवसायासाठी मुद्रा कर्ज योजनेचा लाभ घेऊ शकतात. कर्ज मागणीचा प्रस्ताव उत्पादन, प्रक्रिया, व्यापार व सेवा क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायातील खात्रीशीर उत्पन्न निर्मिती देणारा नवीन/ दर्जावाढ व्यवसाय असावा.

प्रधानमंत्री मुद्रा योजनेसाठी पॅन कार्ड असणे अनिवार्य नाही. तथापि, कर्जदाराने बँकेच्या नियमानुसार KYC करून घेणे आवश्यक आहे.

२५. मुद्रा अंतर्गत रुपये १० लाखाखालील कर्जासाठी मागील २ वर्षाची आयकर परतावा कागदपत्रे बँकेत दाखल करणे आवश्यक आहे काय?

साधारणपणे, लहान कर्जासाठी आयकर परतावा कागदपत्रांची मागणी बँकेकडून केली जात नाही. तथापि, बँकेच्या प्रचलित नियम व धोरणानुसार संबंधित बँक दस्तऐवजांची आवश्यकता विचारात घेऊ शकते.

२६. प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत शिशु गट प्रकारातील कर्जासाठी कर्ज प्रस्ताव मंजुरीचा कालावधी काय आहे?

कर्ज मंजुरीसाठी आवश्यक कागदपत्रे बँकेत दाखल केल्यापासून साधारणत: ७ ते १० दिवसांमध्ये बँकेकडून शिशु गटातील कर्ज मंजूर केली जातात.

२७. प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत पात्र अर्जदार कोण आहेत?

प्रधानमंत्री मुद्रा योजनंतर्गत महिला उद्योजिकांसह मालकी हक्क, भागीदारी फर्म्स, खासगी मर्यादित कंपनी किंवा कोणतीही अन्य संस्था यासह कोणतीही भारतीय व्यक्ती पात्र आहे.

२८. सीएनजी टेंपो/ टॅक्सीच्या खरेदीसाठी मुद्रा कर्ज उपलब्ध आहे काय?

सीएनजी टेंपो/ टॅक्सीच्या खरेदीसाठी मुद्रा कर्ज उपलब्ध आहे, परंतु अर्जदाराने सदरील वाहनाचा वापर सार्वजनिक वाहतूक वाहक म्हणूनच करावा.

२९. खादी व्यवसायासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत कर्ज मिळेल काय?

होय. मुद्रा कर्ज कोणत्याही व्यवसायासाठी, ज्यामध्ये उत्पन्न निर्माण होण्याची क्षमता आहे, त्यासाठी लागू आहे. खादी ही वस्त्रोद्योग क्षेत्रांतर्गत पात्र व्यवसाय आहे आणि या व्यवसायामध्ये उत्पन्न निर्मिती निश्चित असल्याने हा 'मुद्रा' अंतर्गत देखील पात्र व्यवसाय आहे.

३०. मी पेपर सामग्री लघु उद्योगाशी संबंधित आहे, 'मुद्रा'मधून कसा फायदा होऊ शकेल?

'मुद्रा' कर्ज अशा व्यवसायांसाठी बँक/ एनबीएफसी/ सूक्ष्म पत पुरवठा संस्था यांचेकडून उपलब्ध आहे. सर्व प्रकारच्या उत्पादित व्यवसायासाठी, व्यापारासाठी व सेवा क्षेत्रातील व्यवसायासाठी 'मुद्रा' अंतर्गत कर्ज घेता येते. कर्ज प्रकार हे शिशु, किशोर व तरुण या तीन गटप्रकारांमध्ये देण्यात येतात. उद्योग व्यवसायाचा टप्प्याटप्प्याने विकास करण्यासाठी कमी कर्जामध्ये व्यवसाय सुरू करून उद्योगाच्या वृद्धीनुसार गरजेनुरूप कर्ज सुविधा उपलब्ध करण्यासाठी कर्ज प्रकाराची तीन गटांमध्ये विभागणी केली आहे.

३१. मी नुकताच पदवीधर झालो आहे. मी माझा स्वत:चा व्यवसाय सुरू

कोणतेही भारतीय नागरिक जे कर्ज घेण्यास पात्र आहेत आणि त्यांचा व्यवसाय हा उत्पन्न निर्मितीची खात्री देत आहे, अशा व्यवसायासाठी मुद्रा कर्ज योजनेचा लाभ घेता येतो.

करू इच्छितो. 'मुद्रा' मला मदत करू शकेल?

'मुद्रा' कर्ज खालील तीन गट प्रकारामध्ये विभागले आहे. लहान व्यवसायासाठी रु.५० हजारापर्यंतची कर्जे शिशु गट प्रकारामध्ये आणि रु. ५० हजारावरील परंतु रु.५ लाखाखालील कर्जे किशोर गटप्रकारामध्ये उपलब्ध आहेत. रु.५ लाखावरील व रु. १० लाखाखालील कर्ज तरुण गटप्रकारामध्ये उपलब्ध केले आहे. व्यवसायाच्या व प्रकल्पाच्या स्वरूपानुसार 'मुद्रा'च्या विहित नियमानुसार लघु उद्योगांसाठी वित्तसाहाय्य बँका व विविध वित्तीय संस्थांकडून मिळू शकेल.

३२. मी अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानातील पदविका शिक्षण पूर्ण केले आहे. मला स्वत:चे अन्न प्रक्रिया युनिट कसे सुरू करता येईल?

अन्न प्रक्रिया उद्योग हा 'मुद्रा' अंतर्गत कर्ज पुरवठयासाठी एक पात्र व्यवसाय आहे. आपण कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्थेकडून अन्न प्रक्रिया उद्योगासाठी कर्ज/ वित्तीय साहाय्य घेऊ शकता.

३३. मी जरीच्या कामातील कुशल कारागीर आहे. नोकरी करून दुसऱ्यासाठी काम करण्याऐवजी मी स्वत:चा व्यवसाय करून इच्छितो. याबाबत 'मुद्रा' मला मदत करेल का?

आपण आपला स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी आपल्या क्षेत्रातील कार्यरत बँक किंवा इतर वित्तीय संस्थेकडून शिशु गट प्रकारातील वित्तीय साहाय्य घेऊ शकता.

३४. मी फॅशन डिझाइनिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. मला स्वत:चे बूटीक उघडायचे आहे आणि स्वत:चा ब्रँड विकसित करायचा आहे. 'मुद्रा' याबाबत मला काय मदत करू शकेल?

'मुद्रा' महिला उद्योजकांसाठी विशेष पुनर्वित्त योजना राबवत आहे. उदा. महिला उद्यमी मित्र. यामध्ये शिशु, किशोर व तरुण या तीनही गटप्रकारांमध्ये वित्तीय साहाय्य उपलब्ध करून दिले जाते. सूक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था व नॉन-कॉर्पोरेट वित्तीय कंपनीज यांचेकडून महिला उद्योजकांच्या कर्जासाठी २५ बीपीएसची व्याज सवलत उपलब्ध आहे.

३५. माझा फ्रेंचाइजी मॉडेलवर आईस्क्रिम पार्लर उघडण्याचा मानस आहे. 'मुद्रा' मला याबाबत काय मदत करू शकेल?

व्यापारी आणि दुकानदारांसाठी 'मुद्रा' एक विशेष पुनर्वित्त योजना राबवित आहे. आपल्या क्षेत्रातील कोणत्याही बँक/ सूक्ष्म वित्तीय संस्था/ नॉन-बँकिंग वित्तीय संस्था यांचेकडून व्यवसायाच्या गरजेनुरूप वित्तीय साहाय्य घेऊ शकता.

सीएनजी टेंपो/ टॅक्सीच्या खरेदीसाठी मुद्रा कर्ज उपलब्ध आहे, परंतु अर्जदाराने सदरील वाहनाचा वापर सार्वजनिक वाहतूक वाहक म्हणूनच करावा.

प्रधानमंत्री मुद्रा योजना

- **मुदत कर्ज व कॅश क्रेडिट सुविधा - रु. १०.०० लाखापर्यंत बिगरशेती विभागांसाठी जे मॅन्युफॅक्चरिंग, व्यापार व सेवा कृतींमध्ये व्यस्त आहेत.**
- **अन्न उत्पादन विभाग - रु. १०.०० लाखापर्यंत समाविष्ट पीएमएमवाय अंतर्गत**
- **पीएमएमवाय मध्ये अंतर्गत योजना -**
  - शिशु - रु. ५०,०००/- पर्यंत कर्ज
  - किशोर - रु. ५०,००१/- पासून रु. ५,००,०००/- पर्यंत कर्ज
  - तरुण - रु. ५,००,००१/- पासून रु. १०,००,०००/-पर्यंत कर्ज
- **पीएमएमवाय अंतर्गत पात्र पीएमजेडीवाय लाभधारकांसाठी अधिकर्ष/ओव्हरड्राफ्ट सुविधेत वाढ.**
- **कोलॅटरल आणि थर्ड पार्टी हमी नाही.**
- **व्याजदर :**
  - एमएसई कर्ज रु. १०.०० लाखापर्यंतः एमसीएलआर
- **शेतकी अन्य कृती, अन्न प्रक्रिया इ. टप्याटप्याने/स्लॅबवाइज व्याजदर खालीलप्रमाणे**
  - रु. ५०,०००/- पर्यंत एमसीएलआर + ०.७५%
  - रु. ५०,०००/-पेक्षा अधिक आणि रु. २.०० लाखापर्यंत एमसीएलआर + १.५०%
  - रु. २.०० लाखापेक्षा अधिक आणि रु. १०.०० लाखापर्यंत एमसीएलआर + २.००%

  (BSS is Business Strategy Spread which is at present: 0.25%)
- **मुद्रा डेबिट कार्ड सर्व कॅश क्रेडिट खातेधारकांना पीएमएमवाय अंतर्गत पुरविले जाईल**

मुद्रा योजनेसाठी हेल्पलाइनः
मिशन कार्यालय नवी दिल्लीः ०११-४७०७२७४८, e-mail: missionmudra-dfsnic.in

महाराष्ट्र हेल्पलाइन : 1800 1022 636

नोंदणीकृत कार्यालय : **पहिला मजला, एमएसएमई विकास केंद्र, प्लॉट सी ११, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१** संकेतस्थळ : www.mudra.org.in

'यशोमुद्रा महाराष्ट्र' संकल्पना : नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
मांडणी व मुद्रण : मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

प्रधानमंत्री mudra योजना

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई– ४०० ०३२

Created by Media Research & Development (I) Cell: 98199-07982